विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

☐ वर्ष - २ रे ☐ अंक -२५५ वा ☐ अमरावती (महाराष्ट्र) ☐ गुरुवार दि.७ नोव्हेंबर २०२४ ☐ संपादक - शुभांगी जोशी ☐ मुल्य - १ रु. ☐ पृष्ठ -६

सरकारी भरतीचे नियम मध्येच बदलता येणार नाहीत,सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

भरती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी, एकदा नियम ठरवले जातात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकरी भरतीच्या नियमांबोबत महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. 'सरकारी नोकऱ्यांसाठी भरतीचे नियम आधीपासून जे ठरवले आहेत, त्यात बदल करता येणार नाही, असं न्यायलयाने म्हटले आहे. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने सांगितले की, भरती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी, एकदा भरतीचे नियम ठरवले जातात, ते पुन्हा बदलले जाऊ शकत नाहीत. निवडीचे नियम अनियंत्रित नसावेत पण ते घटनेच्या कलम १४ नुसार असावेत.

सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकरी भरतीच्या नियमांबोबत महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. 'सरकारी नोकऱ्यांसाठी भरतीचे नियम आधीपासून जे ठरवले आहेत, त्यात बदल करता येणार नाही, असं न्यायलयाने म्हटले आहे. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने सांगितले की, भरती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी, एकदा भरतीचे नियम ठरवले जातात, ते पुन्हा बदलले

जाऊ शकत नाहीत. निवडीचे नियम अनियंत्रित नसावेत पण ते घटनेच्या कलम १४ नुसार असावेत.सर्वोच्च न्यायालयाने एकमताने सांगितले की, पारदर्शकता आणि भेदभाव न करणे हे सार्वजनिक भरती प्रक्रियेचे वैशिष्ट्य असले पाहिजे. न्यायमूर्ती हृषिकेश रॉय, न्यायमूर्ती पीएस नरसिंहा, न्यायमूर्ती पंकज मिथल आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचाही या खंडपीठात समावेश होता.

या निर्णयामागील प्रकरण राजस्थान उच्च न्यायालयाशी संबंधित आहे. २०१३ मध्ये अनुवादक पदाच्या भरतीदरम्यान, राज्य सरकारने काही नियमांमध्ये बदल केले होते, यामध्ये असे म्हटले होते की, केवळ तेच उमेदवार नियुक्तीसाठी पात्र मानले जातील ज्यांनी लेखी आणि तोंडी ७५ टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. आधीच परीक्षा दिलेल्या उमेदवारांवर हा निर्णय लागू करण्यात आल्याने भरती प्रक्रियेत गोंधळ निर्माण झाला होता.सर्व उमेदवारांना समान संधी मिळावी, यासाठी भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि न्याय्य असावी, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले. मुख्य न्यायमूर्ती चंद्रचूड, न्यायमूर्ती हृषिकेश रॉय, न्यायमूर्ती पमीघंटम नरसिंहा, न्यायमूर्ती पंकज मित्तल आणि न्यायमूर्ती मनोज कुमार मिश्रा यांचा समावेश असलेल्या घटनापीठाने कोणत्याही भरती प्रक्रियेच्या मध्यभागी उमेदवारांची पात्रता किंवा पात्रता बदलणे समर्थनीय नाही.

'खटाखट' खोटं आश्वासन देणाऱ्यांपासून सावधान!

महिलांच्या हक्कावर दरोडा, काँग्रेसचा हाच खरा चेहरा

बोलणं मोठ्ठं	लक्षण खोट्टं
ⓧ कर्नाटकमध्ये गृहलक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा रु. २००० देणार	✓ कर्नाटकमध्ये महिलांना फसवून त्यांचा अपमान केला
ⓧ तेलंगणामध्ये महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा रु. २५०० देणार	✓ तेलंगणामध्ये महिलांची फसवणूक केली
ⓧ हिमाचल प्रदेशमध्ये महिलांना दरमहा रु. १५०० देणार	✓ हिमाचल प्रदेशातील महिलांचा विश्वासघात केला

महिला विरोधी काँग्रेसने नेहमीच आपल्या खोट्या वचनांमुळे नारी शक्तीचा अपमान केला

धोका धर्माला नाही, आरक्षणाला; प्रकाश आंबेडकरांनी ओबीसींना दिला गंभीर इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ पुणे



विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी देखील ओबीसी बांधवांना एक महत्वाचा इशारा दिलाय. ते म्हणाले की, ओबीसी सावधान! जरांगे पाटील यांनी शरद पवारांची घोषणा, दोनशे आमदार विधानसभेत असतील, याच्या अंमलबजावणीला सुरूवात केलीय. पहिल्यांदा उमेदवारी अर्ज भरा, असं म्हणत त्यांनी सर्वांना अर्ज भरायला लावले. निझामी मराठ्यांच्या बैठका झाला. निझामी मराठ्याने काही ठिकाणी गरीब मराठा आणि काही ठिकाणी ओबीसी असे उमेदवार उभे करून घेतले. उरलेल्या ठिकाणी 'मराठा विरूद्ध मराठा' असं चित्र त्या ठिकाणी उभं करण्यात आलंय.

या बैठकांमध्ये मराठा आमदार कसे निघतील, याचीच रचना करण्यात आली. आता या खेळीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे एकत्र आहेत, हे ओबीसींनी पहिल्यांदा लक्षात घ्यावं, असं आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केलंय. हे लक्षात घेतलं नाही तर आपण हुकणार, अशी आताची परिस्थिती असल्याचं आंबेडकर म्हणाले आहेत. त्यांचा निर्णय झालाय की, मराठ्यांनी मराठ्यांनाच मतदान दिलं पाहिजे. आता ओबीसीने स्वत:चं आरक्षण वाचवण्यासाठी भूमिका हीच घेतली पाहिजे की, ओबीसीचं मत हे ओबीसीला, एससी आणि एसटीला द्यायचं. त्याचबरोबर वंचित बहुजन आघाडीत असलेल्या मुस्लिम उमेदवारांना द्यायचं, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत.ही भूमिका आपण बजावली तरच ओबीसीचे उमेदवार निवडून येतील हे आपण लक्षात घ्या. एक प्रचार निश्चितपणे केला जाणार आहे, तो म्हणजे धर्म संकटात आहे. हिंदू धर्म संकटात आहे. आपण आपल्या पूर्वजांचा धर्म सोडणार आहात का? असा सवाल आंबेडकरांनी ओबीसी बांधवांना केलंय. पूर्वजांचा हिंदू धर्म मुघलांच्या काळात सोडला नाही, तो स्वत:च्या काळात का सोडणार, असा सवाल त्यांनी केलाय. ही चर्चा निरर्थक आहे. ती हिंदू महासभा, बजरंग दल यांच्यामार्फत केली जातेय. आपण त्यांना पहिल्यांदा विचारा की, ओबीसीच्या आरक्षणाला समर्थन का करत नाही, असं आंबेडकर म्हणाले आहेत.

काँग्रेसचा प्रचार धडाका! राहुल गांधी, प्रियंका गांधी, खरगेंसह प्रमुख नेते महाराष्ट्रात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७मुंबई

वांद्रे-कुर्ला संकुलातील महाराष्ट्र स्वाभिमान सभेतून लोकसेवेची पंचसूत्री जाहीर करून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या झंझावाती प्रचारसभांचे आयोजन करण्यात आले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस प्रियंका गांधी, कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, तेलंगाणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासह काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते राज्याच्या विविध भागांत काँग्रेस व महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेणार आहेत.

टिळक भवन येथे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व काँग्रेसच्या प्रचार समितीचे अध्यक्ष खा. चंद्रकांत हंडोरे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसच्या प्रचार समितीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना चेन्नीथला म्हणाले की, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे हे पाच दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून १३, १४, १६, १७ व १८ नोव्हेंबरला राज्यातील विविध भागात त्यांच्या सभा होतील. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे १२, १४ व १६ नोव्हेंबर रोजी प्रचार सभा घेणार आहेत. काँग्रेसच्या राष्ट्रीय सरचिटणीस प्रियंका गांधी या १३, १६ व १७ नोव्हेंबरला प्रचार सभांना संबोधित करणार आहेत. तेलंगणा व कर्नाटकचे मुख्यमंत्री तसेच काँग्रेसचे देशभरातील वरिष्ठ नेतेही प्रचारात उतरणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे.

महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराविरोधात काँग्रेसच्या ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले नाहीत त्या सर्व बंडखोरांवर कारवाई करण्यात आली असून त्यांना ६ वर्षांसाठी काँग्रेसमधून निलंबित करण्यात आले आहे. राज्यात कुठेही मैत्रिपूर्ण लढत होणार नाही. वांद्रे कुर्ला संकुलात झालेल्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेत लोकसेवेची पंचसुत्री जाहीर केलेली आहे, त्याचा घरोघरी जाऊन प्रचार केला जाईल. १० नोव्हेंबर रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल ग्रँड हयात मध्ये महाविकास आघाडीचा जाहिरनामा प्रसिद्ध केला जाणार आहे. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिवसेना खासदार संजय राऊत हे उपस्थित असतील.

'मशिदीवरील भोंगे उतरणार नाहीत आणि राज ठाकरेंची सत्ताही कधी येणार नाही', रामदास आठवलेंची खोचक टीका

विदर्भ प्रजासत्ताक दि.७ पुणे

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती सत्ता दिली तर एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी अमरावती येथे एका जाहीरसभेदरम्यान केले होते. या वक्तव्यावर आता राजकीय प्रतिक्रिया येत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांनी एएनआय वृत्तवाहिनीशी बोलताना राज ठाकरेंच्या विधानावर टीका केली. मशिदीवरील भोंगे कधीही हटणार नाहीत, अशी भूमिका मांडत असताना रामदास आठवले यांनी मनसेची सत्ता कधीही येणार नाही, असे सांगितले. मनसेचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतःच्या जीवावर निवडून येतो, असेही आठवले म्हणाले.

रामदास आठवले एएनआयशी बोलताना म्हणाले की, राज ठाकरे वारंवार अशाप्रकारचे विधान करत असतात. आमचे सरकार आले तर मशिदीवरील भोंगे हटविणार असे ते म्हणतात. पण मशिदीवरील भोंगे हटणार नाहीत आणि राज ठाकरेंची सत्ताही कधी येऊ शकत नाही. कितीही वर्ष गेले तरी राज ठाकरेंची सत्ता येऊ शकत नाही. त्यांचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतःच्या जीवावर. मग त्यांचे सरकार कसे येणार? आणि ते कसे भोंगे हटवू शकणार?मी दहशतवादी असलेल्या मुसलमानांचा नेहमीच विरोध केला आहे. पण देशावर, भारताच्या संविधानांवर प्रेम करणारे आणि हिंदूंशी बंधुभाव राखून राहणाऱ्या मुसलमानांचा विरोध करणे ठीक नाही. मशिदीत एक-दोन मिनिटांची अजान होत असते, त्यासाठी भोंगे हटविण्याची काय गरज आहे. भोंगे हटविण्यापेक्षा गरीबी हटवा, भ्रष्टाचार हटवा, भोंगे हटविण्यापेक्षा विषमता, जातीयता हटविली पाहीजे. केवळ १४० - १४५ उमेदवार उभे करून आमदार निवडून येत नसतात. मनसेचे दोनही आमदार निवडून येणार नाहीत. पण राज ठाकरे असे विधान वारंवार करत राहिले, तर माझा पक्ष भोंगे हटविणाऱ्यांना धडा शिकवल्या राहणार नाही, असेही रामदास आठवले म्हणाले.

महायुती

लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ

महायुती चे अधिकृत उमेदवार

रवि राणा यांच्या प्रचारार्थ

बहुजनांचा बहुचर्चित चेहरा

राज्याचे उपमुख्यमंत्री

श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची

जाहीर सभा

दिनांक : ८ नोव्हेंबर २०२४ वेळ : दुपारी १२ वाजता.
स्थळ : गोपाल नगर चौक, डी मार्ट च्या बाजूला, महायुती प्रचार कार्यालय जवळ.

4 रवि राणा

पाना या चिन्हा समोरील बटन क्र. 4 दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

मतदान दिनांक २० नोव्हेंबर २०२४ सकाळी ०७.०० ते सायं ०६.०० वा पर्यंत

साडे तीन कोटींची ATM व्हॅन पोलिसांच्या ताब्यात; पैशांच्या भरलेल्या बॅगा ठाण्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ छत्रपती संभाजी नगर

विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत पोलीस व भरारी पथकांकडून कारवाई केली जात आहे. त्यामध्ये, आदर्श आचारसंहिता लागल्यापासून कोट्यवधी रुपये आणि मौल्यवान वस्तू हस्तगत करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी एका एटीएम मशिनसाठी नेण्यात येणारी कारही पोलिसांनी जप्त केली होती. रात्री उशिरा ही कार एटीएम मशिनमध्ये पैस भरण्यास आल्याने पोलिसांना संशय आला होता. त्यानंतर, आता नालासोपारा

विधानसभेत एक खळबळजनक घटना समोर आली आहे. साडेतीन कोटी रुपये असणारी एटीएम रक्कम घेऊन जाणारी व्हॅन स्थानिक भरारी पथकाने ताब्यात घेतली आहे. सदर व्हॅन नालासोपारा पोलिस ठाण्यात नेण्यात आली असून, या रकमेचा हिशोब मिळत नसल्यामुळे पोलिस अधिक तपास करत आहेत.

अहवालानुसार, या एटीएम व्हॅनमध्ये साडेतीन कोटी रुपये आहेत, परंतु या रकमेचा नेमका हिशोब सादर करण्यात अपयश आल्याने पोलिसांना संशय आला आहे. त्यावरून पोलिस आता तपास करत आहेत की ही रक्कम एटीएमसाठी होती, की निवडणुकीच्या प्रचारासाठी वापरण्यात येणार होती. सदर प्रकरणावर पुढील तपास सुरू असून, व्हॅनमधील कर्मचाऱ्यांची देखील चौकशी केली जात आहे. पोलिसांनी व्हॅनमधील बॅगांमध्ये असलेली रक्कम जप्त केली आहे. तर विरारच्या मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन कोटी ८० लाख एवढी रोख रक्कम कॅश व्हॅनमध्ये सापडली आहे. निवडणूकांच्या आचारसंहितेचा कॅश संदर्भात असलेली नियमावली पाळत नसल्याने, पोलिसांनी कॅश व्हॅन ताब्यात घेऊन चौकशी सुरु केली आहे.

विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com
बुधवार दि. ६ नोव्हेंबर २०२४

कुरुक्षेत्र महाराष्ट्र

संपादकीय ......

जरांगेंचा फुसका बार

आम्ही बर्याच ठिकाणी उमेदवार उभे करणार, आरक्षण न देणार्यांना जागा दाखवून देणार, यंदाची विधानसभा निवडणूक ही मराठा समाजाचे अस्तित्व दाखविणारी असेल, अशा वल्गना करणार्या मनोज जरांगे-पाटील यांची पिसे सोमवारी एकदमच गळून पडली. दिवाळीच्या काळात मोठमोठे सुतळी बॉम्ब काढून जरांगे विरोधकांच्या कानठळ्या बसवतील, असे भासत असताना जरांगेंच्या पिशवीत केवळ फुसके बॉम्बच निघाले, ज्या बॉम्बच्या काळ्या धुराने समस्त मराठा समाजाला अस्वस्थ केले आहे.

विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम होण्याआधी त्यांनी रणांगण सोडल्याने त्यांच्या एकूण भूमिकेवरच आता संशय व्यक्त होत आहे. मनोज जरांगे-पाटील अचानक सत्ताधार्यांचे 'लाडके भाऊ झाले का?' , त्यांना पुन्हा एकदा आश्वासनाचे गाजर दाखवण्यात आले का? मराठा, मुस्लीम आणि दलित मतांच्या जोरावर जरांगेंना यंदाचे विधानसभेचे मैदान गाजवायचे होते असे चित्र उभे करण्यात आले.

मग असे एकाएकी काय झाले की एका जातीच्या आधारे निवडणूक लढता येणार नाही याचा साक्षात्कार जरांगेंना व्हावा? अंतरवाली सराटीत बैठका घेत असताना त्यांना हे का उमगू नये? मुस्लीम आणि दलित समाज आपल्यासोबत नाही हे त्यांना उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशीच कसे समजले? त्यापूर्वी ही बाब त्यांना लक्षात का येऊ नये? उमेदवार लढवायचेच नव्हते मग बीड, केज, परतूर, फुलंब्री, हिंगोली शहर, पाथरी, दहगाव आणि कन्नड येथे उमेदवार देण्याचा मनसुबा त्यांनी रविवारी रात्री का बोलून दाखवला? या मतदारसंघांतील इच्छुकांना का भ्रमात ठेवले? या आणि अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे आता जरांगेंना द्यावी लागणार आहेत. ते ज्या अधिकारवाणीने मराठा समाजाला आजवर उपदेशाचे डोस पाजत होते, त्याच अधिकारात आता समाजही त्यांना प्रश्न विचारणार आहे. त्याची मुद्देसूद आणि तथ्य वाटेल अशी उत्तरे आता जरांगेंना द्यावी लागतील, अन्यथा मराठा समाज पुन्हा कधीही कोणत्या नेत्याच्या पाठीशी इतका एकसंधपणे उभा राहणार नाही. मनोज जरांगेंच्या या 'रणछोड' वृत्तीचा दीर्घकालीन परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. भरवसा ठेवण्यासारखा आपला कोणताही नेता नाही, आपल्याला कुणीही वाली नाही, अशी भावना आता या समाजात रुजू शकते. पर्यायाने ही भावना नैराश्यात रुपांतरीत होऊ शकते.खरंतर गेल्या दोन दिवसांपासून अंतरवली सराटीमध्ये मोठ्या प्रमाणात बैठका पार पडल्या. या बैठकांना उमेदवारांची, इच्छुकांची गर्दी होती. यापैकी अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. इतकेच नाही तर अनेकांनी निवडणूक लढवायची म्हणून आपापल्या मतदारसंघात मोठा खर्चही केला आहे. दरम्यान, ३ नोव्हेंबरला जरांगे पाटलांनी विधानसभा निवडणुकीत काही जागांवर आपले उमेदवार देण्याची घोषणा केली. याबरोबरच काही जागांवर उमेदवार पाडण्याची आणि काही जागांवर पाठिंबा देण्याची भूमिकाही स्पष्ट केली. त्यानंतर रात्री झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी मराठा समाजाची व्यथा संपूर्ण महाराष्ट्रासमोर मांडली आणि ते भावूकही झाले.

मराठा समाजाला कशा पद्धतीने फसवले गेले याचा पाढा त्यांनी वाचला. त्यानंतर सोमवारी सकाळी ७ वाजेपर्यंत ते उमेदवारांची आणि मतदारसंघांची नावे घोषित करणार हे त्यांनी जाहीर केले, पण सोमवारी सकाळी झालेल्या पत्रकार परिषदेत जरांगे पाटलांनी अचानक पलटी मारली. विधानसभा निवडणुकीतून माघार घेण्याचा आपला निर्णय ते घोषित करून मोकळे झाले. मुस्लीम आणि मागासवर्गीय समाजाच्या कार्यकर्त्यांनी मराठा समाजाच्या उमेदवारांना पाठिंबा न देण्याची भूमिका घेतल्याने जरांगे तोंडघशी पडल्याचे आता बोलले जात आहे, परंतु त्यात फार तथ्य दिसत नाही.

खरंतर या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेतून एक लक्षात आले की जरांगेंकडे अनुभवाचा कमालीचा अभाव आहे. ते परिपक्व राजकारणी नाहीत. 'उचलली जीभ, लावली टाळ्याला' असे करून ते टाळ्या मिळवण्यासाठी भाषणे करतात, परंतु त्याची परिणामकारकता काय याचे उत्तर विधानसभा निवडणुकीतील माघारीतून सार्यांनाच मिळाले आहे.

निवडणूक लढणे आणि राजकारणात उतरून प्रभावी भूमिका निभावणे या बाबी कौशल्याला अधोरेखित करणार्या आहेत. केवळ आंदोलनातून पुढे आलेल्या नेतृत्वाला राजकारणातील सर्व आव्हाने पेलता येत नाहीत हे अण्णा हजारेंनंतर आता जरांगेंनीही आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा, दलित आणि मुस्लीम समाजाची मोट बांधून ही निवडणूक लढविण्याचा इरादा जाहीर केला होता. महाराष्ट्रातील राजकारणात मराठा, दलित आणि मुस्लीम समाज हे मोठे घटक मानले जातात. जरांगे यांच्या या निर्णयामुळे या तीन मोठ्या समाज घटकांचे एकत्रित मतदान मिळाल्यास निवडणुकीत चमत्कार होऊ शकेल असा विश्वास अनेकांना वाटत होता. त्याचाच धसका शरद पवारांपासून देवेंद्र फडणवीसांपर्यंत सर्वच नेत्यांनी घेतला होता.

महाविकास आघाडीच्या संयुक्त सभेत लोकसेवेची पंचसुत्री, महाविकास आघाडीच्या ५ गॅरंटी जाहीर

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७ मुंबई – वांद्रे कुर्ला संकुलातील महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमानी सभेत लोकसेवेची पंचसूत्री जाहीर केली. यात ५ गॅरंटीचा समावेश आहे.

मविआची सत्ता आल्यास महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला ३००० रुपये तसेच महिला व मुलींना मोफत बस प्रवास, शेतकऱ्यांचे ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्जमाफ, तसेच नियमित कर्ज भरणा-या शेतक-यांना ५० हजार रु. प्रोत्साहन, जातनिहाय जनगणना व आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्यासाठी प्रयत्न, कुटुंब रक्षण अंतर्गत २५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा व मोफत औषधे व बेरोजगार तरुणांना दर महिन्याला ४००० रुपयांपर्यंत मदत दिली जाईल.

या सभेला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य आणि प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिवसेना खासदार संजय राऊत, सुप्रिया सुळे, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अविनाश पांडे, मुकुल वासनिक, समाजवादी पक्षाचे नेते अबु आझमी यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रातील मविआचे सरकार दोन-तीन अरबपतींची मदत करण्यासाठी भाजपाने चोरी करुन, पैसे देऊन पाडले. धारावीची एक लाख कोटी रुपयांची गरिबांची जमीन तुमच्या डोळ्यादेखत बळकावून एका अरबपतीला दिली जात आहे. महाराष्ट्रातील उद्योग दुसऱ्या राज्यात पळवले आणि त्यातून ५ लाख रोजगार गेले. आयफोन कंपनी, टाटा एअरबस प्रकल्प, वेदांता फॉक्सकॉन गुजरातला पळवले. आता तुमच्यासाठी काम करणारे सरकार निवडून द्या, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले.

महाराष्ट्रातील सरकार महिलांना पैसे देण्याची घोषणा करत आहे पण दुसरीकडे पेट्रोल, डिझेल, गॅससह सर्व वस्तुंची महागाई झाली आहे. या महागाईतून भाजपा सरकार प्रत्येक कुटुंबाच्या खिशातून ९० हजार रुपये काढून घेते व अदानीसारख्या अरबपतींना देत आहे. अदानी अंबानी रोजगार देऊ शकत नाहीत, रोजगार लघु मध्यम व्यापारी देतात पण भाजपा सरकारने हे उद्योगच बंद केले. जीएसटी, नोटबंदी हे छोट्या व्यापाऱ्यांना मारणारे शस्त्र आहे. असे राहुल गांधी म्हणाले.

क्वालिटी हुरड्यासाठी कशी कराल ज्वारी लागवड

दि.६विदर्भ प्रजासत्ताक

साधारणपणे राज्यात हुरडा सिझन ४५ ते ६० दिवस चालतो. हुरडा चवीस सरस, गोड, मऊ, भाजलेल्या हिव्या दाण्याचा हुरडा पर्यटकांना आकर्षित करत आहे.हिरव्या दाण्याचा हुरडा अतिशय स्वादिष्ट लागतो. कारण त्यावेळेला या दाण्यामध्ये मुक्त अमिनो आम्ले, साखर, विद्राव्य प्रथिने, जीवनसत्वे यांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थांचे प्रमाण कमी असते.

जमीन व पूर्वमशागत

ज्वारीपेरणीपूर्वी जमिनीची नांगरट केल्यास जमिनीत पाणी मुरण्यास मदत होते. त्याकरिता पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी जमिनीची बांधबंदिस्ती करावी. सारा यंत्राने वाफे पाडून त्यामध्ये बळीराम नांगराने बांधणी करावी. त्यामुळे पावसाचे पाणी पूर्णपणे वाफ्यात साचून जमिनीत मुरण्यास मदत होते.

पेरणीची योग्य वेळ

१५ सप्टेंबर १५ ऑक्टोबर.

पेरणी वेळेत का करावी?

खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी व भरपूर उत्पादन मिळण्यासाठी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी करावी.

लवकर पेरणी केली तर (१५ सप्टेंबर अगोदर) तर खोडमाशीमुळे मोठ्या प्रमाणात पोंगे मर होते. उशिरा पेरणी केल्यास जमिनीचा ओलावा कमी झाल्यामुळे बियाण्याची उगवण कमी होते.

आर्थिक फायद्यासाठी टप्प्या टप्प्याने लागवड करावी. मात्र कीड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी बीजप्रक्रिया अतिशय महत्वाची.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून १५ दिवसाच्या अंतराने पेरणी.

नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत पेरणी शक्य.

पेरणी अंतर व हेक्टरी बियाणे

दोन ओळीतील अंतर ४५ से.मी. व दोन रोपातील अंतर १५ से.मी. ठेवावे.

पेरणीकरिता हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे.

बीजप्रक्रिया

प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक चोळावे. त्यानंतर २५ ग्रॅम प्रत्येकी अॅझोटोबॅक्टर व पीएसबी या जैविक खतांची बीजप्रक्रिया करावी.

थायमिथोक्झाम (७० टक्के) ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया केल्यास खोडमाशीमुळे होणारी पोंगेमर कमी होते.

खत व्यवस्थापन

मध्यम जमिनीत पेरणी करताना प्रति हेक्टरी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद म्हणजेच ८७ किलो (सर्वसाधारणपणे दोन गोण्या) युरिया व १२५ किलो (सर्वसाधारणपणे अडीच गोणी) एसएसपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे.

भारी जमिनीत पेरणी करतेवेळी प्रति हेक्टरी ६० किलो नत्र व ३० किलो स्फुरद म्हणजेच १३० किलो युरिया (सर्वसाधारणपणे अडीच गोणी) व १८७ किलो एसएसपी (सर्वसाधारणपणे पावणे चार गोणी) द्यावे.

बागायती ज्वारीसाठी, मध्यम व खोल जमिनीकरिता प्रति हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश म्हणजेच १७४ किलो युरिया (सर्वसाधारणपणे साडेतीन गोणी), २५० किलो एसएसपी (सर्वसाधारणपणे पाच गोणी) व ६७ किलो एमओपी (सर्वसाधारणपणे सव्वा गोणी) याप्रमाणे खते द्यावीत.

बागायती ज्वारीच्या पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद, पालाश व अर्धे नत्र द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी पहिली खुरपणी झाल्यावर द्यावे.

भारी जमिनीत प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. त्याकरिता २१७ किलो युरिया (सर्वसाधारणपणे सव्वाचार गोण्या), ३०८ किलो एसएसपी (सर्वसाधारणपणे सहा गोणी) व ८४ किलो एमओपी (सर्वसाधारणपणे पावणे दोन गोणी) द्यावे.

पेरणी करतेवेळी संपूर्ण स्फुरद, पालाश व अर्धे नत्र द्यावे. उर्वरित नत्र साधारणपणे पेरणीनंतर एक महिन्यांनी पहिली खुरपणी झाल्यावर द्यावे.

कोरडवाहू रब्बी ज्वारीस पेरणीच्या वेळी ५०:२५:२५ नत्रः स्फुरदः पालाश प्रति हेक्टरी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. त्याकरिता साधारणपणे दोन गोणी युरिया, तीन गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी या प्रमाणे खतांची मात्रा द्यावी.

आंतरमशागत

ज्वारीची उगवण झाल्यावर १० ते १२ दिवसांनी विरळणी करावी. पिकाच्या सुरवातीच्या ३५ ते ४० दिवसात पीक तण विरहित ठेवावे.

पेरणीनंतर आवश्यकतेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी आणि तीन वेळा कोळपणी करावी.

पहिली कोळपणी पेरणीनंतर तीन आठवड्यांनी फटीच्या कोळप्याने करावी.

दुसरी कोळपणी पेरणीनंतर पाच आठवड्यांनी पासच्या कोळप्याने करावी. त्यामुळे रोपांना मातीचा आधार मिळतो.

तिसरी कोळपणी आठ आठवड्यांनी दातेरी कोळप्याने करावी. त्यामुळे जमिनीच्या भेगा बुजवण्यास मदत होऊन जमिनीतील ओल्याव्याचे बाष्पीभवन न होता जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होते.

पाणी व्यवस्थापन

कोरडवाहू ज्वारीस संरक्षित पाण्याची सोय असल्यास पीक गर्भावस्थेत असताना पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी किंवा पीक पोटरीत असताना ५० ते ५५ दिवसांनी द्यावे.

दोन पाणी देणे शक्य असल्यास वरील दोन्ही नाजूक अवस्थेत ज्वारीला पाणी द्यावे.

बागायती ज्वारीस मध्यम जमिनीत तिसरे पाणी फुलोऱ्यात असताना पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी द्यावे.

पेरणीनंतरच्या व्यवस्थापनामुळे उत्पादनात २० टक्के भरीव वाढ होते.

आरोग्य संपदा
आहार

गोड खाण्याच्या सवयीवर असा करा कंट्रोल

दि.७ विदर्भ प्रजासत्ताक

बर्याच लोकांना गोड खाण्याची इतकी वाईट सवय असते की, त्यांना दिवसभरा मधून काही गोड पदार्थांची गरज भासते.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, तुम्ही जेवढी साखर खाता, तेवढी गोड खाण्याची तुमची इच्छा वाढते. आपल्या आरोग्यासाठी साखर अत्यंत हानिकारक आहे. लठ्ठपणा आणि मधुमेह व्यतिरिक्त, हे इतर अनेक रोगांची शक्यता वाढवतात. त्यामुळे आहारातील साखरेचा वापर कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. पण आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगणार आहोत. ज्यामुळे तुम्हाला साखरेला पर्याय मिळेल. आणि ही गोड खाण्याची वाईट सवय काही विशेष पद्धतींनी १० दिवसात नियंत्रित केले जाऊ शकते.

या गोष्टींपासून दूर रहा– तुम्ही मैदा, आर्टिफिशयल तयार केलेले गोड पदार्थ, हायड्रोजनयुक्त फॅट्स आणि पॅकयुक्त पदार्थांपासून दूर रहा. तसेच तुम्ही बिना साखरेचा चहा आणि कॉफी दररोज प्या. विशेषतः बाजारात उपलब्ध असलेल्या पेयांना विसरूनही स्पर्श करू नका.

मनुके, खजूर, अंजीर आणि प्लम यांसारखा सुक्यामेवामध्ये नैसर्गिकरित्या गोडपणा असतो. याव्यतिरिक्त ते आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहेत. जे आपल्या शरीराचे पोषण करतील. तुम्ही तुमच्या संध्याकाळच्या स्नॅकमध्ये या पदार्थांचा समावेश करू शकता. या गोष्टींचा आहारात समावेश केल्याने भूक लवकर लागत नाही आणि पोट जास्त वेळ भरलेले राहते.

आहारात प्रथिनांची मात्रा वाढवा– तुमच्या न्याहारी, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यामध्ये प्रथिनांचे प्रमाण वाढवा. तसेच अंडी, शेंगदाणे, बियाणे, मासे, चिकन, मांस, सोया दूध आणि ओटमीलचा आहारात समावेश करा. प्रत्येक आहारातून चांगले फॅट घेण्याचा प्रयत्न करा.

जास्त तणावात राहू नका– जेव्हा तुम्ही तणावाखाली असता तेव्हा तुमचे कोर्टिसोल वाढते. या संप्रेरकामुळे भूक वाढते आणि अशा परिस्थितीत ज्यांना गोड खायला आवडतात. ते तणावाखाली असल्यास फक्त साखरयुक्त गोष्टी खायला बघतात. त्यामुळे गोड खाणे टाळण्याकरिता तुम्ही चांगली आणि पूर्ण झोप घ्या. ८ तासांपेक्षा कमी झोपल्याने जास्त कॅलरी खाण्याची इच्छा वाढते.

सुका मेवा फायदेशीर– मनुके, खजूर, अंजीर आणि प्लम यांसारखा सुक्यामेवामध्ये नैसर्गिकरित्या गोडपणा असतो. याव्यतिरिक्त ते आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहेत. जे आपल्या शरीराचे पोषण करतील. तुम्ही तुमच्या संध्याकाळच्या स्नॅकमध्ये या पदार्थांचा समावेश करू शकता. या गोष्टींचा आहारात समावेश केल्याने भूक लवकर लागत नाही आणि पोट जास्त वेळ भरलेले राहते.

साखरेऐवजी हे खा– साखरेऐवजी, तुम्ही मध, गूळ, खजूर, नारळ साखर इत्यादींचा आहारात समावेश करा. या पदार्थांमध्ये नैसर्गिक शर्करा असते, ज्यामुळे साखरेची लालसा कमी होते. चव वाढवण्यासाठी तुमच्या आहारात सफरचंद, चेरी, बेरी, केळी, द्राक्षे, डाळिंब, पीच आणि संत्री यांचा समावेश करू शकता. ही फळे आवश्यक पोषक आणि नैसर्गिक शर्करा समृध्द असतात.

पुरवणी यादीमध्ये ११ हजार ४८२ मतदारांची पडली भर

बडनेरात सर्वाधिक वाढ

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अमरावती ६अमरावती जिल्हा निवडणुक विभागाने १५ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. परंतु, विधानसभा निवडणुकीतून कोणताही मतदार वंचित राहू नये याकरीता १५ ते १९ ऑक्टोबर या चार दिवसांत मतदार नोंदणीकरीता शेवटची संधी देण्यात आली. या चार दिवसांत जिल्ह्यात ११ हजार ४८२ मतदारांनी नोंदणी केली आहे. यामध्ये बडनेरा मतदार संघात सर्वाधिक २,७०४ मतदार वाढले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत २५ लाख ४६ हजार ४५८ मतदार मतदानाचा हक्क बजाविणार आहे. जिल्ह्यात आठ विधानसभा मतदार संघात २० नोव्हेबर रोजी निवडणुक होवु घातली असुन याकरीता निवडणुक विभागाकडून तयारी करण्यात आली आहे. १५ ऑक्टोबर राजी निवडणुक आयोगाने आचारसंहीता जाहीर करीत त्याच दिवशी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केली होती. त्या यादीमध्ये १२ लाख ८९ हजार १९६ पुरूष, १२ लाख ४५ हजार ६८४ महीला, ९६ इतर अशा २५ लाख ३४ हजार ९७६ मतदारांचा समावेश होता. या चार दिवसांत जिल्ह्यात ११ हजार ४८२ मतदारांची भर पडली आहे. यामध्ये बडनेरा मतदार संघात सर्वाधिक २७०४ मतदार वाढले आहेत. तर सर्वात कमी ५७५ मतदारांची धामणगाव मतदार संघात नोंदणी झालेली आहे.

विधानसभा मतदारसंघनिहायवाढलेली मतदारांची संख्या

धामणागाव रेल्वे ५७५, बडनेरा २७०४,अमरावती २११६, तिवसा १२१८, दर्यापूर ७७८, मेळघाट २०८९, अचलपूर ११६७, मोर्शी-८९५,एकूण-११,४८२.

पेरणीच्या कालावधीनुसार कशी कराल गव्हाच्या वाणांची निवड

दि. ६विदर्भ प्रजासत्ताक– गव्हाची पेरणी १ ते १० नोव्हेंबर या कालावधीत करावी. बागायती गव्हाची वेळेवर पेरणीची योग्य वेळ म्हणजे नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा होय.

या कालावधीत पेरणी केल्यास गव्हाचे उत्पादन चांगले येते. बागायती गव्हाची पेरणी सुद्धा उशिरा करता येते. परंतु वेळेवर पेरणी केलेल्या गव्हापेक्षा उत्पादन कमी येते.

बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरवड्यास हेक्टरी अडीच क्विंटल उत्पादन कमी येते व त्यामुळे १५ डिसेंबर नंतर पेरलेले गव्हाचे पीक फायदेशीर ठरत नाही.

पेरणीसाठी विविध वाण

१) बागायती वेळेवर पेरणीकरीताएन आय ए ड्ब्ल्यू ३०१ (त्र्यंबक), एन आय ए ब्ल्यु ९१७ (तपोवन), एन आय ए ब्ल्यु २९५ (गोदावरी)

२) गहू पेरणी बागायती उशिरा पेरणीकरीता एन आय ए ब्ल्यु ३४, ए के ए ब्ल्यु ४६२७

३) जिरायत पेरणीकरिता एन आय डी ब्ल्यु १५ (पंचवटी), ए के डी ब्ल्यु ३९९७ (शरद)

४) कमी पाण्यात पेरणीकरिता

निफाड ३४, एन आय ए ब्ल्यू १४१५ (नेत्रावती)

बियाणे आणि खत व्यवस्थापन

हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. पेरणीच्या वेळी हेक्टरी ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश व पेरणीनंतर ३ आठवड्यांनी खुरपणी केल्यानंतर उर्वरीत ६० किलो नत्र द्यावे.

गहू वाणांची निवड कशी कराल?

नवनीत राणांकडून पुन्हा १५ सेकंदाचा उल्लेख...

तुला १५ मिनिटे लागतील, पण आम्हाला पंधरा सेकंदही लागणार नाहीत

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७गुरुकुंज मोझरी प्रक्षोभक भाषणामुळे दहा वर्षांपासून प्रसिद्धीच्या झोतात असणाऱ्या ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन म्हणजेच 'एआयएमआयएम'चे आमदार अकबरोद्दीन ओवेसी यांच्याविषयी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान माजी खासदार नवनीत राणा यांनी केलेले वक्तव्य गाजले होते. आता पुन्हा ते वक्तव्य चर्चेत आले आहे.

अकबरुद्दीन ओवेसी यांनी राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. अकबरुद्दीन ओवेसी यांनी या निवडणुकीतील पहिलीच सभा काल छत्रपती संभाजीनगरमध्ये घेतली. या भाषणात त्यांनी पुन्हा एकदा १५ मिनिटांचा उल्लेख केला. प्रचाराच्या वेळेचा संदर्भ देत ओवेसी म्हणाले की, आता ९ वाजून ४५ मिनिटे झाली आहेत. वेळ झाली आहे. अजून १५ मिनिटे बाकी आहेत, धीर धरा, संयम ठेवा. ना मी त्यांचा पिच्छा सोडणार ना ते माझा सोडणार, चल रही है मगर क्या गुंज है. त्यांच्या या वक्तव्यावर नवनीत राणा यांनी आज प्रत्युत्तर दिले. भाजपचे तिवसा मतदारसंघाचे उमेदवार राजेश वानखडे यांच्या

प्रचारार्थ गुरूकुंज मोझरी येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना नवनीत राणा यांनी ओवेसी यांच्यावर टीका केली.

नवनीत राणा म्हणाल्या, छोटे ओवेसी काल छत्रपती संभाजीनगरमध्ये येऊन गेले. ते म्हणाले की आता माझ्या घड्याळात ९ वाजून ४५ मिनिटे झाली आहेत. पंधरा मिनिटे बाकी आहेत. मी त्यांना म्हणते माझ्या घड्याळात ३ वाजले आहेत. केवळ पंधरा सेकंद बाकी आहेत. तुला १५ मिनिटे लागतील, पण आम्हाला पंधरा सेकंदही लागणार नाहीत. अकबरुद्दीन ओवेसी यांनी २०१२ मध्येही १५ मिनिटांचेच एक भाषण केले होते. पोलीस हटवा मग कळेल कोण ताकदवान आहे ते, असे ते त्या सभेत म्हणाले होते. या वक्तव्यांमुळे त्यांना तुरुंगातही जावे लागले होते.

नवनीत राणा यांनी आपल्या भाषणात काँग्रेसच्या आमदार आणि तिवसाच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्यावरही टीका केली. त्या म्हणाल्या, माझ्या नणंदबाईने खूप माया जमवली आहे. सात पिढ्यांना पुरेल इतकी संपत्ती आहे. त्या जर काही वाटत असतील, तर घेऊन घ्या, खूप आहे त्यांच्याजवळ. नांदगावपेठ येथे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मोठे उद्योग आले. पण, नणंदबाईने येथील तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी काहीच केले नाही. गुरूकुंज मोझरी विकास आराखड्याच्या कामात भरपूर भ्रष्टाचार झाला आहे, असा आरोप नवनीत राणा यांनी केला.

राज ठाकरे यांच्या सभेनंतर मनसेचे रेल्वे इंजिन सुसाट

पर्यटनस्थळाची दुरवस्था; अमरावतीचा विकास खुंटला

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अमरावती – हेडिंग बोल्डराज ठाकरे यांनी बुधवारी येथील सायन्स स्कोर मैदानावर 'राजगर्जना' सभेतून देश, राज्याच्या राजकारणावर सडकून टीका केली. अमरावतीशी त्यांचा स्नेह आणि जिव्हाळा देखील त्यांनी मांडला. आमदार आज येथे, उद्या तिथे यावरही प्रकाश टाकला. सरकार कधी, कुणाचे? कोण कोणत्या पक्षात याकडे राज ठाकरे यांनी लक्ष वेधले. आमदार फुटले, खोके घेतले हे सर्व जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. दिल्ली पासून तर गल्लीपर्यंतच्या समस्या, प्रश्नांना त्यांनी उजाळा दिला. काहीही असू द्या राज ठाकरे यांचे काही मुद्दे हे नागरिकांच्या मनाला स्पर्शन गेले. म्हणूनच राज ठाकरे यांच्या सभेनंतर अमरावतीत मनसेचे रेल्वे इंजिन वेगात धावेल, अशा बोलक्या प्रतिक्रिया नागरिकांच्या उमटल्या . राज ठाकरे यांना मानणारा मोठा तरुण वर्ग आहे. महाराष्ट्रा च्या विकासाची ब्ल्यू प्रिंट थेट जनतेसमोर सादर करणारा नेता राज ठाकरे हे एकमात्र आहेत. बुधवारच्या सभेतही त्यांनी अमरावतीच्या ओबडधोबड विकासावर बोट ठेवले. एकदा संधी द्या विकास काय असतो, हे दाखवून देईल, असा विश्वास राज ठाकरे यांनी दर्शविला. मनसेचे आमदार हे जनतेसोबत मतदार संघात राहतील. ईतर पक्षाचे आमदार पुणे, मुंबईत स्थायिक होतात, तसे अमरावती त होणार नाही, अशी ग्वाही देण्यास ते विसरले नाहीत. अमरावतीचे युवक युवती रोजगारासाठी पुणे, मुंबईकडेजात असल्याबाबत चिंता व्यक्त करताना राज ठाकरे यांनी लोक प्रतिधींना जबाबदार धरले. त्यामुळे मतदारांनो, हेवा वाटणारा महाराष्ट्र घडविण्यासाठी मनसेला संधी द्या, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना
प्रतिपच्चंद्र... लेखेव वर्धिष्णु

राजकमल चौकात पिवळी माती आणि पाकिस्थान झेंडे? पप्पू पाटील

अमरावती मतदारसंघाचे मनसेचे उमेदवार मंगेश उर्फ पप्पू पाटील यांनी बुधवारी जाहीर सभेत मनोगत व्यक्त करताना राजकमल चौकात पाकिस्तानचे झेंडे आणि पिवळी माती उधळली जाते? हा सर्व प्रकार होत असताना कोणीच काही बोलत नाही, अशी टीका त्यांनी केली. विशिष्ट समुदायाचा मोर्चा काढला जातो. दंगली घडविल्या जातात. मात्र या प्रकाराचा निषेध करण्यासाठी मोर्चा काढला तर मनसेवर कारवाई करण्यात येते. अमरावती शहराच्या शाश्वत विकासावर आजी– माजी आमदार बोलत नाही. परंतु येत्या ५ ते ६ महिन्यात अमरावतीत आयटी पार्क आणणार, असा विश्वास पप्पू पाटील यांनी दिला.

इवोनिथ कंपनीत स्फोट; २२ कामगार भाजले, तिघांना नागपूरला हलविले

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७ वर्धा : भुगाव येथील इवोनिथ स्टील कंपनीत स्लॅकपीटमध्ये ब्लास्ट झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. यात २२ कामगार भाजले आहेत.ही घटना बुधवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घडली असून जखमींना तातडीने सावंगीच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. लोखंड निर्मितीचा कारखाना असलेल्या इवोनिथ लॉजिस्टीक स्टीलमध्ये नियमित काम सुरू असताना स्लॅकपीटचा पाण्यासोबत संबंध येऊन गॅस तयार झाल्याने भडका उडाला. स्फोट झाल्याने आजुबाजुला असलेले २२ कामगार भाजले. यातील तीन कामगार जास्त भाजल्याने त्यांना तातडीने नागपुरला हलविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

जवळपास १९ कामगारांना सावंगीच्या आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. या ठिकाणी त्यांच्यावर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले. या

घटनेची माहिती मिळताच कंपनी प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरु केल्या. जखमींच्या प्रकृतीची काळजी कंपनी पूर्णपणे घेणार असून कंपनी सर्वतोपरी मदत करणार आहे. अद्यापही जखमींची नावे आणि अधिकृत संख्या कळू शकली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना नमन शिवाजी महाराजांचे दर्शन घेत

प्रीती बंड यांचा प्रचाराला प्रारंभ

महाजनपुरा येथे प्रचारयात्रेला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अमरावती: बडनेरा विधानसभेच्या अपक्ष उमेदवार लोकनेते संजय बंड यांच्या पत्नी प्रीती बंड यांनी बुधवारी महाजनपुरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली. प्रभागातील नागरिकांनी प्रीती बंड यांचे जागोजागी औक्षवंत करून जंगी स्वागत करत त्यांच्या विजयासाठी शुभेच्छा दिल्या. प्रीती बंड यांनी महाजनपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन घेऊन हारार्पण केले.

यावेळी प्रचारयात्रेला महाजनपुरा शिवाजी गेटपासून सुरुवात करून खदानपुरा, कांडलकर प्लॉट, मावदेवाडी, खोलापुरी गेट, हनुमाननगर, केवलेवाडी, परदेशीपुरा, दत्तुवाडी, आमले प्लॉट येथील नागरिकांशी संवाद साधत प्रीती बंड यांनी मतदारांचे आशीर्वाद घेत मोठ्या त्यांनी केले. यावेळी प्रीती बंड यांचा 'ऑटो मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन रिक्षा' मोठ्या मताधिक्याने विधानसभेतजाईल, असा विश्वासदेखील नागरिकांनी व्यक्त केला.महिला व मतदारसंघातील जनतेचा मोठ्या प्रमाणात जनसंपर्क मिळत आहे. पदयात्रेचा समारोपीय कार्यक्रम महाजनपुरा येथील संत गजानन महाराज मंदिर येथे करण्यात आला.यावेळी राजू चव्हाण, हेमंत विजयकर, मोहन पटके, संजय धानोरकर, श्याम बोरकर, छत्रपती चव्हाण, वासुदेव सावरकर, लकी विजयकर, प्रवीण ठाकूर, रवींद्र उज्जैनकर, अनिल सावरकर, नरेंद्र रावेकर, अरविंद सावरकर, रामदास प्रधाने, विनोद कोठेकर, दीपक विजयकर, प्रवीण सावरकर, रामाजी उज्जैनकर, रवी सावरकर, नरेश सावळे, दिनेश विजयकर, पिंटू अनासे, मुकुंद देशमुख, प्रशांत आठवले, सागर वाटकर, विकी वाटकर त्यांच्यासह शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे

स्व. श्री रामचंद्रजी पोटे पाटील यांना श्रद्धांजली

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अमरावती– पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती चे आधारस्तंभ, मार्गदर्शक श्री रामचंद्रजी पोटे पाटील यांचे नुकताच निधन झाले त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला .श्रद्धांजली कार्यक्रमची सुरवात प्रार्थनेने करण्यात आली. महाविद्यालयातील संचालक , सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. कृषी क्षेत्रात चांगला अभ्यास व दूरदृष्टी असल्याने नावीन्यपूर्ण काम त्यांनी कृषी क्षेत्रात केले. त्यांनी केलेले सामाजिक कार्य, त्यांची संस्थेच्या विकासासाठी असलेली दूरदृष्टी, महत्वपूर्ण योगदानामुळे स्व. रामचंद्रजी पोटे पाटील सदैव स्मरणात राहतील असे प्रतिपादन यावेळी उपस्थितांनी केले.यानंतर दोन मिनिटे मौन पाळत स्व. रामचंद्रजी पोटे पाटील यांना उपस्थित कर्मचारी यांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविणार– मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र

८ ते १९ नोव्हेंबरपर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन

प्रत्येक तालुक्यात दोन मोठे कार्यक्रम घेणार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७ अमरावती– विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदार जनजागृतीसाठी स्वीपच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. यात दि. ८ नोव्हेंबरपासून कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे. याचे तालुकास्तरावर नियोजन करण्यात यावे, तसेच या आठ दिवसांच्या कालावधीत प्रत्येक तालुक्यात दोन मोठे कार्यक्रम घ्यावेत, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी दिले. स्वीप उपक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा आज घेण्यात आला. श्रीमती महापात्र यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे तालुकास्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद साधला.श्रीमती महापात्र यांनी, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी लोकसभा निवडणुकीत पिंक फोर्स तयार करण्यात आली होती. यावेळी महिलांनी सक्रीय सहभाग नोंदवावा. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध कार्यक्रमातून त्यांच्यापर्यंत पोहोचणे शक्य आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका, उमेद आणि बचतगटांच्या महिलांनी घरोघरी जाऊन मतदान करण्याचे आवाहन करावे. यावर्षी अंगणवाडी सेविका महिला बचतगटाचे चर्चासत्र घेणार आहे. सदर चर्चासत्र हे सायंकाळच्या वेळेत घेण्यात यावे. पिंकफोर्सच्या माध्यमातून गृहभेटी करण्यात याव्यात. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मतदानाची टक्केवारी कमी नोंदवली गेली आहे, अशा भागावर लक्ष केंद्रीत करावयाचे आहे. यावेळी महिलांचे मतदान होण्यासाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे. यात महिलांचा सक्रीय सहभाग घेण्यात यावा.

महिलांच्या सहभागाने मतदानाची टक्केवारी वाढविण्यास मदत होणार आहे. यावेळी ८० टक्के मतदानाचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी प्रत्येक तालुक्यात दोन मोठे उपक्रम राबविण्यात येणार आहे, तसेच आठवडाभरात राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन तातडीने करण्यात यावे. यावेळी दि. १६ नोव्हेंबर रोजी सर्व तालुक्याच्या ठिकाणी रॅली काढण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्यातील बारी समाजाला न्याय देण्यासाठी अशोक वसूले प्रहारमध्ये

भाजप व काँग्रेसला बसणार मोठा फटका, बच्चू कडू यांच्या नेतृत्वावर दाखविला विश्वास

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अचलपूर– अचलपूर विधानसभा मतदारसंघावर प्रभाव असलेल्या बारी समाजाला महाविकास आणि महायुती दोन्ही सरकारकडून नेहमीच उपेक्षा मिळाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अगदी विश्वासातील असलेले बारी समाजाचे नेते अशोक वसुले यांची भाजपकडून प्रत्येकवेळी बोळवण करण्यात आली असली तरी बच्चू कडू यांच्या माध्यमातून बारी समाजाचे अनेक विकासात्मक कामे करण्यात आल्यामुळे त्यांच्या कार्यशैलीला प्रभावित होऊन बारी समाजाचे नेते अशोक वसुले यांनी भाजप सोडून प्रहार पक्षात प्रवेश घेतला. अशोक वसुले गेल्या अनेक वर्षांपासून भाजपशी जुळलेले आहेत मात्र भाजपचे सरकार असतांना सुद्धा भाजप कडून बारी समाजाची उपेक्षा करण्यात आली.दरम्यान बच्चू कडू यांना मतदार संघातील बारी समाजाने जेव्हा जेव्हा कामे सांगितली तेव्हा तेव्हा कोणताही पक्षपात न करता बच्चू कडू यांनी समाजाची सर्व कामे केली.अचलपूर विधानसभा मतदार संघात बच्चू कडू यांच्या माध्यमातून बारी समाज भवन,विविध विकासात्मक कामे, शैक्षणिक, सामाजिक कामे करून समाजातील बांधवांची वैयक्तिक कामे केली व समाज बांधवांचा विश्वास जिंकला आहे. तरुणपणापासून भाजपशी एकनिष्ठ असलेले अशोक वसुले यांनी बारी समाजाच्या शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत त्यांच्या उपस्थितीत मंगळवारी बारी समाजाचे महाराष्ट्र अध्यक्ष अशोक वसुले यांनी प्रहार मध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांच्या सोबत महादेवराव वसुले, मोहन केदार, उत्तम कुऱ्हाडे, विलास डकरे, वासुदेव कुऱ्हाडे, डॉ. नेमाडे, मोहन सातपुते, सतीश दाभाडे, प्रमोद इंगोले या बारी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी देखील प्रहार मध्ये प्रवेश केला. याप्रसंगी बच्चू कडू यांनी सर्वांचे स्वागत करीत त्यांना प्रहार मध्ये योग्य तो मानसन्मान दिल्या जाईल व बारी समाजाच्या सर्व समस्या सोडविण्यात मी कटिबद्ध राहील अशी ग्वाही दिली.

माझा शंभर टक्के विजय झाला –बच्चू कडू

वसुले यांच्या प्रहार प्रवेशावेळी बच्चू कडू यांनी आपले मत व्यक्त केले. वसुले यांची समाज आणि भाजप बद्दल असलेली आस्था मी बघितली आहे, पण आज त्यांनी बच्चू कडू वर विश्वास ठेवत प्रहारमध्ये प्रवेश करीत आमची बाजू बळकट केली. त्यांच्या प्रवेशाने माझा शंभर टक्के विजय झाला आहे असे मी मानतो. वर्ष झाले की कार्यकर्ते जातात पण, आमच्या बाबत उलटे झाले असून आज मोठ्या संख्येने कार्यकर्ते आमच्याकडे येत आहे. कार्यकर्ते व बच्चू कडू यांचे नाते किती घट्ट आहे हे यावरून दिसून येत असल्याचे बच्चू कडू म्हणाले.विविध पक्षातील कार्यकर्त्यांची प्रहार मध्ये इनकमिंग होत आहे ही बाब राज्याला वेगळी दिशा दाखविल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास बच्चू कडू यांनी व्यक्त केला.

भाजप व काँग्रेसने समाजाला काहीच दिले नाही– वसुले

बारी समाजाचे महाराष्ट्र अध्यक्ष अशोक वसुले यांनी याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले प्रहारमध्ये प्रवेश करण्याचे मुख्य कारण म्हणजे बच्चू कडू यांनी बारी समाजासाठी केलेले कार्य होय.हा पक्षप्रवेश बिनशर्त असल्याचे देखील ते म्हणाले. मी तरुण वयापासून भाजपसोबत मनापासून जुळलो होतो,पण या कार्यकाळात त्या ठिकाणी समाजासाठी देखील काहीच मिळाले नाही. यामुळे संपूर्ण बारी समाजाचा विश्वासघात झाला आहे, म्हणून या परिस्थितीत समाजाचे भले झाले पाहिजे यासाठी मी बच्चू कडूंचे नेतृत्व स्वीकारत प्रहारमध्ये प्रवेश केल्याचे सांगून ते बारी समाजासाठी निश्चित मोठे कार्य करतील अशी अपेक्षा अशोक वसुले यांनी यावेळी व्यक्त केली .

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ च्या अनुषंगाने

स्वीप कार्यक्रमाचे प्रक्षेपण करण्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांचे आदेश

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती–

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मतदानाची टक्केवारी अधिकाधिक वाढावी म्हणून नागरिकांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृतीपर उपक्रम स्वीप कार्यक्रमांतर्गत राबविण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. आयोगाच्या सदर निर्देशानुसार सध्या राज्यभर स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तथापि, सदर स्वीप कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.यास्तव दिनांक ८/११/२०२४ ते १९/११/२००२४ या कालावधीमध्ये राज्यभर स्वीप कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी, यास्तव, दि.८ नोव्हेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता राज्यभर घ्याववयाच्या स्वीप कार्यक्रमाचे राज्यस्तरीय प्रक्षेपण (लॉचिंग) मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर स्वीप प्रक्षेपण कार्यक्रम थेट ऑनलाईन प्रसारीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील मुख्यालयी, तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये दि. ८/११/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वा. जिल्हास्तरीय व विधानसभा मतदारसंघ स्तरावरील स्वीप कार्यक्रमाच्या प्रक्षेपण कार्यक्रमाचे जिल्हास्तरावरुन आयोजन करावे. तसेच या कार्यक्रमामध्ये मतदानाची प्रतिज्ञा घेणे, निवडणूक गीत वाजवणे, जिल्हयातील मान्यवर व्यक्ती, प्रसिध्द कलावंत, खेळाडू यांच्याकडून नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन ईत्यादी कार्यक्रम घेण्यात यावे. यावेळी जिल्ह्यातील स्वीप आयकॉन, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, जिल्ह्यातील नामवंत खेळाडू, नामांकित कलावंत तसेच तृतीयपंथी आणि दिव्यांग या वंचित गटातील नामांकित व्यक्ती यांना आमंत्रित करण्यात यावे. त्याचप्रमाणे, जिल्हयात राबवावयाच्या विविध स्वीप उपक्रमांचे वेळापत्रक सोबत जोडले आहे. वेळापत्रकातील उपक्रमा सोबत आपण आपल्या स्तरावरुन इतर नाविन्यपूर्ण उपक्रमही राबवू शकता. दि. ८ ते १९ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीमध्ये जिल्हयात विविध स्वीप उपक्रम राबवून मोठ्या प्रमाणात नागरिकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात यावी,असे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी यांनी सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना दिले आहे.यामध्ये दिनांक ८ ते १९ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत राज्यात जिल्हा आणि मतदारसंघ स्तरावर राबवायचे उपक्रम८ नोव्हेंबर २०२४ला मतदार शपथ / निवडणूक गीत / फ्लॅश मॉब९ नोव्हेंबर २०२४लारांगोळी१० नोव्हेंबर २०२४पथनाट्य११ नोव्हेंबर २०२४मतदार जागृतीविषयक स्पर्धा (पोस्टर, चित्रकला, प्रश्नमंजुषा इ.)१२ नोव्हेंबर २०२४मानवी साखळी१३ नोव्हेंबर २०२४विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र /– संकल्प पत्र१४ नोव्हेंबर २०२४मॅरेथॉन१५ नोव्हेंबर २०२४औद्योगिक क्षेत्रातील वोटर अवेरनेस फोरमच्या माध्यमातून कामगारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठीचे उपक्रम१६ नोव्हेंबर २०२४पायी रॅली (वॉकेथॉन), सायकल रॅली / बाईक रॅली१७ ते १९ नोव्हेंबर २०२४लाघरोघरी भेटींच्या माध्यमातून, मतदारांना मत देण्यासाठी प्रोत्साहीत करणं, मतदान केंद्र जाणून घेणं, मतदान कसं करावं याविषयी मार्गदर्शन करण्याचे उपक्रमप्रत्येक मतदाराच्या घरी भेट देणेया सर्व उपक्रमामध्ये युवा,महीला,दिव्यांग,तृतीयपंथी,ज्रेष्ठ नागरीक यांचा सहभाग राहणार आहे अशी माहीती जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारीअधिकारी संजीता महापात्र यांनी दिली आहे.

MBHAJINAGAR, NAGPUR & AMRAVATI DIVI
lace – Chhatrapati Sambh

मेळघाट विधानसभा मतदार संघातील घुंगरु बाजारात मतदान जनजागृती

धारणी स्वीप कक्षाचा उपक्रम–शेकडो आदिवासी मतदारांचा सहभाग

मतदार जनजागृती कार्यक्रम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

आदिवासी क्षेत्रात दिवाळी सणा नंतर तरुण–तरुणी सह वयोवृध्द आदिवासी संस्कृती जपण्याकरीता आणि आपली परंपरा आबादीत राहावी म्हणुन मोठ्या उत्सवात घुंगरू बाजार भरला जातो.या बाजारात आदिवासी नागरीक नविन पोषाख घालुन नृत्य सादर करतात या बाजारात तरुणांचा मोठा सहभाग असतो याचा फायदा घेत आगामी २०नोव्हेंबरला होणारी विधानसभा निवडणूक यात मतदानाचा टक्का वाढवा या करीता स्वीप कक्षाव्दारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.याचा एक भाग म्हणुन स्वीप कक्षाव्दारे घुंगरू बाजारात जाऊन मतदारांना मतदानाचे महत्व पटवून दिले आणि त्यांना मतदानाची प्रतिज्ञा देण्यात आली.विशेष म्हणजे जनजागृती कक्षातील नोडल अधिकारी,कर्मचारी यांनी कोरकु भाषेत जनजागृती केली याला आदिवासी नागरीकांनी मोठा सहभाग घेतला होता. डतएएझ मतदार जनजागृती अभियानांतर्गत मेळघाट विधानसभा क्षेत्र ४१मध्ये आज दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी डतएएझ पथक प्रमुख सुनील खडे , पथक सदस्य बाबुलालजी जावरकर, योगेश मालवीय,श्रीमती उमेकर मॅडम व संजय इंगळे एबीपी फेलो व सर्व टीम यांनी मेळघाट विधानसभा क्षेत्रामध्ये दिवाळीनंतर होणाऱ्या घुंगरू बाजारामध्ये जाऊन घुंगरू नृत्याच्या माध्यमाने आपला संपूर्ण सहभाग नोंदवून अठरा वर्षावरील सर्व नागरिकांना २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये निर्भयपणे कोणताही जातीभेद धर्म न बाळगता आपले मतदान करण्याबाबत आव्हान करण्यात आले.

यावेळी मतदानाची शपथ देण्यात आली.विधानसभेत मतदानाचा टक्का वाढावा म्हणुन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटीयार आणि जिल्हा स्वीप नोडल अधिकारी संजीता महापात्र या करीता मतदार संघात स्वीप कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.या कक्षाव्दारे विविध नाविन्य पूर्ण उपक्रम अमरावती जिल्हात राबविण्यात येत आहे.असे स्वीप कक्षाचे राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

दिवाळीचे फटाके झाले शांत, आता फुटणार निवडणूक प्रचाराचे फटाके, लढतींचे चित्र स्पष्ट

सर्वपक्षीय उमेदवारांकडून प्रचाराचे नियोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ अमरावती

दिवाळीचा सण संपला असून, अर्ज माघारीची मुदतही संपली आहे. चार विधानसभा मतदारसंघांत निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्यामुळे निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा मंगळवारपासून उडायला सुरुवात झाआहे. त्यामुळे पुढील प्रत्येक दिवसाच्या प्रचाराचे सर्व पक्षांच्या उमेदवारांकडून नियोजन झाले आहे. मतदारसंघ पिंजून काढण्यावर सर्वपक्षीय उमेदवारांचा भर असणार आहे. त्यातून प्रत्येक दिवसाच्या प्रत्येक तासाचे नियोजन उमेदवारांनी केले आहे. त्यानुसार कार्यकर्त्यांना कामाला लावले जाणार आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागून १५ दिवस उलटून गेले. तरी अद्याप अनेक मतदारसंघांतील लढतींचे चित्र स्पष्ट नव्हते. काही मतदारसंघांत महाविकास आघाडीआणि महायुतीच्या उमेदवारांविरोधात त्यांच्या पक्षातील, तसेच आघाडी व युतीत सहभागी असलेल्या पक्षांच्या नेत्यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. त्यातून पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विजयात अडसर येऊ नये, म्हणून बंडखोरांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरू आहेत.

सोमवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता.अनेकांची मनधरणी करून काही बंडोबांना थंड करण्यात पक्षांना यश आले, तर काहींनी उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यामुळे पक्षाच्या उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. असे असले तरी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांतील लढतींचे चित्र स्पष्ट होईल. महाआघाडी व महायुतीच्या उमेदवारांकडून आता प्रचाराला जोर येईल.

मागचे काही दिवस केवळ स्थानिक मंडळे, विविध समाजाच्या संस्था यांना भेटी देऊन संवाद साधण्यावर उमेदवारांचा भर होता. बहुतांश उमेदवारांनी प्रत्येक दिवसाचे वेळापत्रक तयार केले आहे.

प्रचारासाठी हातात कमी दिवस असल्याने मतदारसंघातील कोणताही भाग भेटीविना राहू नये, याची काळजी उमेदवार घेत आहेत. त्यासाठी कार्यकर्तेही कामाला लागले आहेत.

■ कोणताही भाग भेटीविना राहू नये

दिवाळीमुळे कार्यकर्तेही कुटुंबासोबत होते. या पार्श्वभूमीवर प्रचार सुरू केल्यास ते कितपत कार्यकर्ते उपस्थित राहतील, याबाबत उमेदवार साशंक होते. मतदारही दिवाळी साजरी करत होते. आता दिवाळीनंतरच घरोघरी जाऊन प्रचार करण्यावर भर असणार आहे.

■ फराळाच्या निमित्ताने प्रचार

दिवाळीत प्रचार थांबला: मात्र फराळाच्या निमिताने, संपर्क साधण्याकडे बहुतांश उमेद– वारांचा कल होता. काही उमेदवारांनी कार्यकर्त्यांच्या घरी भेटी देऊन फराळाचा आस्वाद घेतला. यातून कार्यकर्त्यांमध्येही उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी नाराजी असल्यास ती दूर करण्याचा प्रयत्न केला. काही नेत्यांनी बंडखोरांच्या घरी भेटी देत त्यांची मनधरणी केली: मात्र मतदार कुणाला कॉल देतात याकडे सगळ्यांचे लक्ष आहे.

पोस्टल मतपत्रिका केली व्हायरल, जवानावर गुन्हा दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

POSTAL BALLOT
COLLECTION
BOX

दि.७पाचोरा (जि.जळगाव) : पोस्टल मतपत्रिका व्हायरल केल्याप्रकरणी सीमा सुरक्षा दलाच्या जवानावर पाचोरा पोलिसांत बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कमलेश हेमराज पाटील, (रा. तारखेडा, ता. पाचोरा) असे या गुन्हा दाखल झालेल्या जवानाचे नाव आहे. त्याला पाचोरा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीची पोस्टल मतपत्रिका पुरवण्यात आली होती. त्यावर त्याने मतदान करून ही मतपत्रिका व्हॉट्सपवर प्रसारित केली.

याप्रकरणी भडगावच्या तहसीलदार शीतल सोलट यांनी कमलेशशी संपर्क साधला. त्यावर त्याने ही मतपत्रिका व्हायरल केल्याचे सांगितले. याप्रकरणी निवडणूक नायब तहसीलदार रणजीत निंबा पाटील यांनी फिर्याद दिली. त्यावरुन या जवानावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

योगी आदित्यनाथ म्हणतात महाविकास नव्हे, तर महाअनाडी आघाडी

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अमरावती :– महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत दोन आघाड्या समोरासमोर आहे. प्रामाणिक मूल्यांच्या आणि मुद्यांच्या आधारे महायुतीने विकासाचा आराखडा आपल्यासमोर मांडला आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडी आहे. या आघाडीला राष्ट्रधर्म ठाऊक नाही, संत–महापुरूषांच्या विचारांशी घेणे–देणे नाही. युवकांच्या भविष्याची, बहिणींच्या सुरक्षेची चिंता नाही. काँग्रेस पक्षाकडून तर अपेक्षाच ठेवू नये. ही महाविकास नव्हे, तर महाअनाडी आघाडी आहे, अशी टीका उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुरूकूंज मोझरी येथे प्रचारसभेत बोलताना केली.

योगी आदित्यनाथ म्हणाले, देशात आंतकवाद, नक्षलवाद पसरविण्यासाठी काँग्रेसची धोरणे कारणीभूत ठरली आहेत. काँग्रेसजवळ कुठलीही मूल्ये, आदर्श नाहीत. भविष्याच्या योजना नाहीत. सत्ता ही त्यांच्यासाठी भ्रष्टाचाराचे एक माध्यम ठरले आहे. त्यांना देशात अराजकता पसरवून सत्ता मिळवायची आहे. पण, त्यांची इच्छा कधीच पूर्ण होणार नाही. श्रीराम आणि श्रीकृष्णाचे अस्तित्व नाकारणाऱ्या काँग्रेसच्या लोकांना आता देव आठवायला लागले आहे.

योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' हा नारा दिला. ते म्हणाले. आम्ही सर्व जण एकत्र राहू, तेव्हाच सुरक्षित राहू. हिंदूंच्या धार्मिक मिरवणुकांवर दगडफेक करणाऱ्यांना धडा शिकवण्याची गरज आहे. ते आता मिरवणुकांवर दगड फेकणार नाहीत, तर मिरवणुकीच्या समोर झाडू घेऊन रस्त्याची सफाई करताना दिसतील.

केवळ नेत्यांसाठीच कार्यकर्त्यांचा प्रचार!

घरातच बसून फोनवर विचारतात हवा कुणाची

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७ चांदुर बाजार: विधानसभा निवडणूक प्रचार आता जोर धरू लागला आहे. प्रत्येकगावागावातून विविध राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते झाडून कामाला लागले आहेत. नेत्यांच्या परिवारातील, तसेच पक्षांच्या महिला पदाधिकारीसुद्धा मोठ्या प्रमाणात प्रचारासाठी फिरत आहेत. काही नेते व पदाधिकारी मात्र केवळ पक्षाकडे आपल्या प्रचाराची नोंद व्हावी, याच हेतूने फक्त सोपस्कार पार पाडण्यासाठी प्रचार करीत असल्याचे दिसून येत आहे. घरातच बसून किंवा शेताच्या बांधावरून आपल्या उमेदवाराची हवा विचारत नेत्यांना सांगत असल्याने असा उमेदवार विजयी होणार कसा? असा प्रश्न निर्माण होत आहे.विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला केवळ चौदा दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाचा उमेदवार आपण विजयी व्हावे, म्हणून जीवाचे रान करीत आहे. यात काही पक्षनिष्ठ कार्यकर्ते काम करीत असताना दुसरीकडे काही कार्यकर्ते आपला उमेदवार निवडून आला पाहिजे, अशा जिद्दीने ते निवडणुकीचा प्रचार करीत आहे. बरेच नवे–जुने पदाधिकारी, कार्यकर्ते, आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समितीचे सदस्य, माजी नगरसेवक, असे अनेक जण प्रचारात गुंतले आहे. मात्र, घरच्या भाकरी खाऊन जिद्दीने कशाचीही पर्वान करता पायपीट करणार्या कार्यकर्त्यांची मात्र दिवसेंदिवस वानवा झाली आहे. तो कार्यकर्ता मिळविण्याची कसरत उमेदवारांनाही करावी लागत आहे. शेताच्या बांधावरून आपल्या उमेदवाराची हवा विचारत नेत्यांना सांगत असल्याने असा उमेदवार विजयी होणार कसा? असा प्रश्न निर्माण होत आहे.

ध्येयवादी कार्यकर्ते दिसेनात

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काही दशकांमध्ये विशिष्ट अशा ध्येयाने प्रेरित झालेली पिढी होती. काळाच्या ओघात असे निष्ठावान ध्येयवादी कार्यकर्ते बाजूला पडल्याचे विदारक चित्र दिसून येते. दिवसा प्रचाराच्या नावाने एसी गाड्यांमध्ये फिरणे झाल्यावर सायंकाळी ढाबे, बार, रेस्टॉरंट हाउसफुल्ल होत आहेत. ही संस्कृती आता वरचेवर वाढत आहे. ही विधानसभा निवडणूक अनेक दृष्टींनी अत्यंत महत्त्वाची आहे,

ज्येष्ठ, दिव्यांगांचे मतदान १० दिवस आधीच होणार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अमरावती – वयाची ८५ वर्षे पूर्ण केलेले ज्येष्ठ नागरिक आणि वेगवेगळ्या कारणांमुळे दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या मतदारांना प्रत्यक्ष मतदानाच्या दहा दिवस आधीच मतदानाची संधी प्राप्त झाली आहे. विशेष असे की हे मतदान करायला त्यांना कोणत्याही मतदान केंद्रावर जायचे नसून स्वत: निवडणूक यंत्रणा त्यांच्या घरी येऊन त्यांचे मतदान करून घेणार आहे. त्यासाठी ९ ते ११ नोव्हेंबर असे तीन दिवसीय वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील २ हजार ४२२ ज्येष्ठ नागरिक आणि ४४० दिव्यांग अशा २ हजार ८६२ मतदारांचा यामध्ये समावेश आहे. निवडणूक यंत्रणेच्या आवाहनानुसार या मतदारांच्या नातेवाईकांनी आधीच त्या–त्या निवडणूक अधिकाऱ्याशी संपर्क साधून तसा अर्ज भरुन दिला आहे. दरम्यान तशी खात्री झाल्यानंतर संबंधितांना वेळही कळविण्यात आली आहे. त्यानुसार निवडणूक यंत्रणेचे अधिकारी–कर्मचारी त्यांच्या घरी पोहचून 'पोस्टल बॅलेट' च्या माध्यमातून त्यांचे मतदान करुन घेणार आहे.

निवडणूक यंत्रणेकडून मिळविलेल्या माहितीनुसार तिवसा मतदारसंघातील सर्वाधिक ४८४ ज्येष्ठ नागरिकांनी गृह मतदानाचा पर्याय निवडला असून हाच पर्याय निवडणाऱ्या तेथील दिव्यांग मतदारांची संख्या ४७ आहे. त्याखालोखाल अचलपुर मतदारसंघातील ३८८ ज्येष्ठ नागरिकांनी गृह मतदानाची निवड केली असून ६७ दिव्यांग मतदारही घरुनच मतदान करणार आहेत. धामणगाव रेल्वे मतदारसंघातील ३६० ज्येष्ठ नागरिक आणि ५२ दिव्यांगांनी हा पर्याय स्वीकारला असून मोर्शी मतदारसंघात असा पर्याय निवडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या ३५४ तर दिव्यांगांची संख्या ६९ आहे.

दर्यापुरातील २७३ ज्येष्ठ नागरिक आणि ४८ दिव्यांग, अमरावतीतील २२१ ज्येष्ठ नागरिक आणि ८२ दिव्यांग, बडनेरा मतदारसंघातील १९२ ज्येष्ठ नागरिक आणि ५३ दिव्यांग तर मेळघाट विधानसभा मतदारसंघातील १५० ज्येष्ठ नागरिक आणि २२ दिव्यांगांनीही गृह मतदानाच्या प्रक्रियेला पसंती दर्शविली आहे. या सर्व मतदारांकडे आगामी ९ ते ११ नोव्हेंबरदरम्यान निवडणूक यंत्रणा पोचणार असून त्यांच्या घरीच त्यांचे मतदान करुन घेणार आहे.

उमेदवारांना उपस्थितीची संधी– गृह मतदानाची ही प्रक्रिया पारदर्शक असावी म्हणून संबंधित मतदारसंघातील उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनाही उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्वसाधारण मतदान केंद्रांवर ज्याप्रमाणे गुप्त मतदान केले जाते, तशीच गुप्तता या मतदानावेळीही राखली जाणार असून प्रत्येक मतदाराला मतदानांती आपली मतपत्रिका (बॅलेट) संबंधित मतपेटीत टाकावी लागणार आहे. त्यानंतर मतमोजणीच्या दिवशीच ती बाहेर काढली जाईल, असे यंत्रणेचे म्हणणे आहे.

९ ते ११ नोव्हेंबरचे वेळापत्रक निश्चित;२४२२ ज्येष्ठ, ४४० दिव्यांग मतदार

निवडणूक काळात 'किती' पैसे स्वतः कडे बाळगता येतात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

राजकीय पक्ष, नेते, उमेदवार, कार्यकर्ते यांना माहित असलेल्या आचार संहितेतील तरतुदी सामान्य नागरिकांस माहित असतीलच असे नाही. या तरतुदी माहित नसणारा सामान्य व्यक्ती पण प्रसंगी अडचणीत येवू शकतो, अशी ही तरतूद म्हणता येईल.

या निवडणूक काळात प्रवासात किंवा स्वतःजवळ ५० हजार रुपये बाळगता येतात. त्यापेक्षा अधिक रक्कम तपासणीत दिसून आल्यास तुम्हास चौकशीस सामोरे जाण्याची आपत्ती आहे. ५० हजार रुपये जर प्रवासात नाक्यावरील स्थिर तपासणी पथक किंवा भरारी पथक यांना तुमच्याजवळ आढळल्यास त्याचा हिशोब तुम्हास द्यावा लागणार आहे. म्हणजे हे पैसे कुठून आणले, कशासाठी काढले, कोणास देणार अशी प्रश्न सरबत्ती होणार. त्यासाठी जवळ पुरावा असणे आवश्यक आहे. म्हणजे बँकेतून काढले असल्यास तसा पुरावा लागणार.

चेक देऊन काढले असल्यास चेकची झेरॉक्स किंवा तांत्रिक पुरावा म्हणजे बँकेचा पैसे काढल्याचा एसएमएस संबंधित तपासणी अधिकाऱ्यांस दाखवावा लागेल. तो नसेल तर मग तुमच्याकडील पैसे अधिकारी ठेवून घेईल. त्याची पावती देईल. व सदर रकमेचा पुरावा दिल्यानंतर तुमचे पैसे तुम्हास परत मिळतील. पण याबाबत निवडणूक संहिता थोडी उदार पण आहे. पैसे घेऊन जाणारी व्यक्ती कोण व कशी आहे हे प्रथमदर्शनी सहज ओळखता येवू शकते. म्हणजे शेतकरी शेती खर्चाचे किंवा माल विक्रीचे पैसे घेऊन जात असेल तर त्यास नाहक त्रास देवू नये, खरं काय ते ओळखावे असे धोरण आहे.

पण सामान्य माणूस या तपासणीत गोंधळून जातो. त्याच्याकडे असणाऱ्या रकमेचे त्यास योग्य समर्थन करता येईलच असे नाही. अश्या वेळी अधिकारी कसं आहे यावर सगळे काही अवलंबून असते, असे एका अधिकाऱ्याने नमूद केले.समजा जवळ असलेल्या अधिकच्या पैश्याचे समर्थन पुराव्याशिवाय करता आले नाही तर ते पैसे ठेवून घेत त्या व्यक्तीस बँकेकडून पैसे काढले असे लिहून असणारा कागद आणावा लागणार. याची स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसेस आहे. त्यानुसार कार्यवाही होणार. पण वाद होवू नये म्हणून असलेल्या रकमेचा पुरावा जवळ ठेवणे केव्हाही चांगले, असे सांगण्यात आले.

निवडणूक काळात प्रामुख्याने मोठ्या रकमेचा वापर गैर कामांसाठी होत असल्याचे म्हटल्या जाते. मतदारास आमिष म्हणून रोख रक्कम देण्याच्या घटना उजेडात आल्या आहेत. या काळात बहुतांश उमेदवार हे विविध निवडणूक कार्यासाठी रोख रकमेचाच उपयोग करतात. किंवा नगदी असेल तरच अपेक्षित व्यवहार होत असतात. म्हणून त्यास आळा घालण्यासाठी निवडणूक आचार संहितेत अशी तरतूद झाली. पण तरीही मोठ्या रकमा वाहून नेण्याचे व त्या पकडल्या गेल्याची उदाहरणे सर्वत्र दिसून आली आहे.

सोशल मीडियावर सायबर सेलचा वॉच

आचार संहिता भंग करणाऱ्याच्या विरोधात होणार कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ अमरावती

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला जिल्ह्यात मतदान होणार आहे. निवडणुकीची घोषणा झाली त्या दिवसापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान उमेदवार आणि त्या पक्षांचे स्टार प्रचारक यांच्यावतीने किंवा त्यांना फायदेशीर होईल, अशा बातम्या वृत्तपत्रांमधून, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमातून, केबल चॅनल्स, मोबाइल नेटवर्क किंवा सोशल मीडिया यावर देताना उमेदवाराने त्याची माहिती रोजच्या रोज निवडणूक विभागास सादर करणे बंधनकारक आहे.

उमेदवाराच्या परवानगीशिवाय त्यांच्या प्रचारासाठी कोणी अशाप्रकारच्या बातम्या प्रकाशित किंवा प्रसारित केल्यास त्यांच्यावर भारतीय दंड विधान संहिता लोकप्रतिनिधी कायदा आदी कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.सोशल मीडियावर मतदारास प्रलोभने, लाच देणे, समाजामध्ये जातीय-धार्मिक तेढ निर्माण करणे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशी कोणतीही पोस्ट प्रसारित करणे, पक्षांच्या

नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या सार्वजनिक कामाशी संबंधित नसलेल्या खासगी बाबींवर टीका करणे, मत मिळविण्यासाठी जाती-धर्माच्या नावावर मतदारांना आवाहन करणे या प्रकारचे कोणतेही व्हिडीओ, फोटो लाईक करणे, फॉरवर्ड करणे अर्थात ते पुढे पाठविणे, त्यावर आपली प्रतिक्रिया देणे, आपल्या स्टेटसला ठेवणे या कृती कायद्याचा भंग करणार्या आहेत.

यावर राहील नजर

अमरावती शहर आणि ग्रामीण पोलिसांचा सायबर सेल आता व्हॉट्सअॅप ग्रुप, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यावर सोशल मीडिया तसेच वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक मीडिया, केबल चॅनल्स, इंटरनेट, मोबाइल नेटवर्क यावर करडी नजर ठेवणार असून, त्याबाबत संबंधितांवर प्रचलित कायद्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात येणार आहे.

समाधान नगर-खापर्डे बगीचा-लोकमान्य कॉलोनी येथे महायुतीच्या उमेदवार सौ.सुलभाताई खोडकेंच्या घड्याळाचा गजर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

अमरावती शहरात सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था निर्माण होण्यासाठी सर्वप्रथम शहरी भागातील समस्या जाणून घेत आपण दर्जेदार रस्ते बांधकाम करणे, प्रभागा-प्रभागात अंतर्गत रस्ते बांधकाम करण्यासह यासोबतच सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना भौतिक व सर्वोत्तम शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यामुळेच आज उत्तम शिक्षण देणारी शाळा म्हणून आज मनपाच्या शाळा ओळखल्या जात आहे.वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण,वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे वायू प्रदूषणाची समस्या निर्माण होऊ नये, याकरिता राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम राबविण्यावर आपला सातत्यपूर्ण भर आहे.समाजकारण,राजकारण आणि व्यवसाय या सर्व क्षेत्रांत मानवी संबंध हा सर्वांत महत्त्वाचा घटक असतो.यापूर्वी अमरावतीकरांनी मला गत निवडणुकीत भरघोस प्रतिसाद देत मतदान करीत २०१९ ते २०२४ करिता लोकसेवेची संधी दिली होती.जनतेनी माझ्यावर दर्शविलेला विश्वास सार्थ ठरवीत आपण सामाजिक संवेदनशीलता,समाजाप्रती जागरूकता आणि समाजाप्रती जवाबदारीची जाणीव बाळगून जनसेवेची कामे करण्यासह कोट्यवधी रुपयांची विकासकामांची पूर्तता केली.हाच विश्वास व आशीर्वाद कायमस्वरूपी माझ्यासोबत ठेवून जेणेकरून समाजऋण फेडण्याचे कार्य निरंतर सुरू राहावे यासाठी आपण सर्वांनी आगामी बुधवार दिनांक २० नोव्हेंबर-२०२४ रोजी घड्याळ या चिन्हासमोरील क्रमांक-४ चे बटन दाबून मला बहुसंख्येने मतदान करीत लोकसेवेची संधी द्यावी,३८-अमरावती विधानसभा निवडणुक-२०२४ करिता महायुतीच्या अधिकृत उमेदवार-सौ.सुलभाताई संजय खोडकेंनी असे विनंतीपूर्ण आवाहन यावेळी समाधान नगर-खापर्डे बगीचा-लोकमान्य कॉलोनी परिसर स्थित स्थानिक नागरिकांना केले.मतदान प्रक्रियेत तरुणाईचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण तरुणांमध्ये विचारांची नविनता आणि बदलाची जाणीव अधिक असते.आजची तरुणाई सुशिक्षित आणि जागरूक असून ,त्यांना देशाच्या विकासात योगदान देण्याची ही एक अमूल्य संधी असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनींसह युवक-युवतींनी मोठया प्रमाणात मतदान करून -आपल्या मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकटीकरणाच्या प्रक्रियेत उत्कृष्ट सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी सर्वोदय कॉलोनी-आदिवासी कॉलोनी येथील मतदात्यांना केले.

आपला मुलगा आपल्या दारी यात्रेत रवी राणा यांच्या प्रचाराचा धडाका

जागोजागी रवी राणा यांचे स्वागत व ओवाळणी घालून देत आहे आशीर्वाद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ बडनेरा

भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे, लहूजी शक्ती सेना, शेतकरी संघटना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचाराचा धडाका सुरू आहे. आपला मुलगा आपल्या दारी यात्रेत सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत रवी राणा १५ ते १६ किलोमीटर पर्यंत पायदळ फिरून घरोघरी भेट देऊन माय बाप जनतेचा आशीर्वाद घेत आहे. यावेळी प्रत्येक क्षेत्रात भावनिक प्रसंग पाहवयास मिळत

आहे. लाडक्या बहीणी आणि मातृ शक्ती रवी राणा यांची ओवाळणी घालून तिलक लावून आशीर्वाद देण्यासाठी सरसावल्या आहेत. यशोदा नगर, चैतन्य कॉलनी, दस्तूर नगर, जेवळ नगर या भागात रवी राणा यांच्या पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या क्षेत्रात रवी राणा यांच्या पुढाकाराने ५० कोटींचे विकास कामे करण्यात आले आहे. करिता समाधानी परिसरातील मातृ-पितृशक्ती, युवा वर्ग पुढे येत आहेत. त्यांना मनापासून आशीर्वाद देत आहे. जिथं रवी राणा यांची पदयात्रा आली, तिथं वातावरण प्रफुल्लित होऊन सर्व परिसरवासी त्यांना मायेची थाप देत आहे. युवा वर्गात ही नवचैतन्य निर्माण होताना दिसत आहे. रवी राणा यांच्या सतत जनसंपर्कातील आपुलकीने लोकांच्या मनात वेगळेच स्थान निर्माण केले आहे. हेच प्रमुख कारण आहे की, रवी राणा आल्यावर त्यांचे मनापासून स्वागत करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रात हजारो नागरिक, लाडक्या बहीणी त्यांच्या प्रचारासाठी सरसावले आहेत. या भागात रवी राणा यांनी पदयात्रा करून माय बाप जनतेचा आशीर्वाद घेत आहे. यावेळी हजारो नागरिक व लाडक्या बहीणी यांनी रवी राणा यांच्या विजयाचा निर्धार कर पाणा निवडणूक चिन्हावर पुन्हा एकदा आपली मोहोर लावण्याचे जाहीर केले.एकच बाणा, निवडून आणू रवी राणा, रवी राणा, जनतेच्या मनातला एकच कार्यकर्ता, तो म्हणजे रवी राणाच. अश्या जाहीर घोषणा बडनेरा शहरात घरोघरी देण्यात येत असल्याचे चित्र पाहून विरोधक धास्तावले आहेत.

मतदार संघाचा विकास हेच माझे कर्तव्य : सुनील खराटे

जुन्या अमरावतीत पदयात्रेने प्रचाराचा झंझावात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

बडनेरा विधानसभा मतदारसंघातील अनेक भाग विकासापासून दूर असून विद्यमान आमदाराने विशेष करून मागास व झोपडपट्टी असणाऱ्या भागाकडे दुर्लक्ष केले. परिणामी या भागात आज अनेक समस्या असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. या समस्या दूर करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी माझी उमेदवारी असून वस्तीनुरूप भेदाभेद न करता संपूर्ण मतदारसंघाचा विकास करणे हे माझे प्रथम कर्तव्य राहणार असल्याचे प्रतिपादन बडनेरा विधानसभा मतदारसंघातील महाविकास

आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांनी केले. बडनेरा मतदारसंघात येणाऱ्या जुन्या अमरावती शहरातील भागात सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ व समर्थनार्थ पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेच्या समारोपसंगी ते बोलत होते .जुन्या अमरावती शहरातील माताखिडकी परिसरातून सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या पदयात्रेस प्रारंभ झाला. देवी मंदिर ,श्रीकृष्ण मंदिर, आनंद नगर, बनकरवाडी, दत्तूवाडी ,महाजनपुरा ,हनुमान नगर, केवलेवाडी, व्यंकटेश नगर, गडगळेश्वर मंदिर परिसर, गांधी आश्रम, पुष्पक कॉलनी, शिक्षक कॉलनी या मार्गाने सुरू झालेल्या या पदयात्रेचा समारोप आनंद नगर परिसरातील गजानन महाराज मंदिराजवळ झाला.याप्रसंगी झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पदयात्रेत शिवसेना महानगर प्रमुख पराग गुडधे ,प्रभाकर वाळसे, हनुमानभाऊ गुजर ,रवी जिजकार,योगेश विजयकर ,प्रवीण रावळे, सागर ढोके, रिंकू पंचवटे यांच्यासह आघाडीतील विविध घटक पक्षांचे कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते.

आमिषाला बळी पडू नका

यावेळी मतदारसंघात कुठल्याही परिस्थितीत बदल घडवायचा असून दलित वस्ती, मागास भागाचा विकास करण्यासाठी सुनील खराटे यांच्यासारख्या तळागाळात काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांची गरज असून कुठल्याही आमिषाला बळी न पडता सजग मतदारांनी आपल्या मतदानाचा योग्यरित्या हक्क बजावत आपला व आपल्यासाठी तसेच आपल्याकरिता सदैव तत्पर असलेल्या सुनील खराटे सारख्या उमेदवारास विजयी करण्याचे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. मान्यवरांच्या या आवाहनाला उपस्थित मतदार व कार्यकर्त्यांनी हात उंचावून उत्स्फूर्त असा प्रतिसाद नोंदविला.

'फेक नॅरेटिव्ह'च्या फॅक्टरीचे शरद पवार मालक, देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१५ पिंपरी

अलीकडे फेक नॅरेटिव्हची फॅक्टरी सुरू झाली आहे आणि शरद पवार यांच्यासारखे नेते या फॅक्टरीचे मालक असल्यासारखे वागायला लागले आहेत. ते सांगतात की, सगळे उद्योग गुजरातला गेले. खरंतर जेवढी परकीय गुंतवणूक भारतात झाली, त्यातील ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. त्यामुळे आश्चर्य याचे वाटते की, शरद पवार आणि उद्धव ठाकरे गुजरातचे प्रवक्ते असल्यासारखे वागत आहेत. त्यामुळे गुजरात सरकारला जाहिरात करायची गरज नाही, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.६) काळेवाडी फाटा येथील मैदानावर सभा झाली. त्यावेळी देवेंद्र फडणवीस बोलत होते.फडणवीस म्हणाले, २०१४ला आपले सरकार आले. आमच्या काळात महाराष्ट्र एक नंबरला होता. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर पहिल्या वर्षी कर्नाटक एक नंबरला गेले. दुसर्या वर्षी गुजरात गेले. आम्ही सरकार आल्यानंतर महाराष्ट्रला नंबर एकवर नेऊ, असे २०२३ मध्ये सांगितले होते. आता महाराष्ट्र नंबर एकवर आहे.

याचबरोबर, सुप्रिया सुळे या फेक नरेटिव्ह फॅक्टरीच्या डायरेक्टर आहेत. त्या म्हणाल्या हिंजवडी आयटी हबमधून कंपन्या स्थलांतरित झाल्या. मात्र, हिंजवडीतील उद्योगांचे स्थलांतर होत आहे, असा चुकीचा प्रचार केला जात आहे. महाविकास आघाडीच्या काळात सर्वाधिक उद्योग बाहेर गेले आहेत. आमच्या काळात उद्योग शहराबाहेर गेले आहेत, ते राज्याबाहेर गेले नाहीत. मात्र त्याबाबत सुप्रिया सुळे विनाकारण फेक नरेटिव्ह निर्माण करत आहेत. शरद पवार यांच्यासारखे नेते फेक नॅरेटिव्हच्या फॅक्टरीचे मालक आहेत. आम्ही नवीन योजना आणल्या. त्यातून दहा लाख तरुणांना रोजगार देणार आहोत. २५ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार आहोत. ज्यामध्ये दहा लाख तरुणांसाठी दहा हजार रुपये सरकार खर्च करेल आणि तरुणांना प्रशिक्षण देईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

उद्धव ठाकरेंचे पोटातील ओठात आले : फडणवीस

आम्ही लाडक्या बहिणींना सत्ता आल्यावर २१०० रुपये देणार आहोत. आम्ही सख्खे भाऊ आहोत, त्यामुळं सावत्र भावांचा याला विरोध आहे. न्यायालयात जाऊन या सावत्र भावांनी ही योजना बंद पाडण्याचे प्रयत्न केले. मात्र, आम्ही न्यायालयात योग्य पद्धतीने मांडणी केली आणि योजना राबवली. आता तर उद्धव ठाकरे म्हणाले की, महायुती सरकारने लागू केलेल्या योजना बंद पाडणार. याचा अर्थ लाडकी बहीण योजना ते सर्वात आधी बंद करणार. त्यांच्या पोटातील ओठात आले आहे, असे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधाला.

केंद्र सरकारने तिसऱ्यांदा वाढवली मुदत

ई-केवायसीला अखेर ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

प्रत्येक शिधा पत्रिका धारकाला ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे शिधापत्रिकेत नावे असलेल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला ई- केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर होती. आता केंद्र सरकारकडून या प्रक्रियेला मुदवाढ देण्यात आली आहे. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

सध्या शासकीय योजनेच्या प्रत्येक लाभार्थ्याला ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. बँकेचे खाते असो किंवा शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा



असो, प्रत्येक ठिकाणी ई-केवायसी बंधनकारक करण्यातआली आहे. त्यातच आता सर्वसामान्य नागरिकांकडे रेशनकार्डसाठीही असणाऱ्या ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती.

मात्र, या मुदतीत सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी झालेली नसल्याने आता केंद्र सरकारने या प्रक्रियेला मुदतवाढ दिली आहे. सरकारने काही महिन्यांपूर्वी केशरी, पांढऱ्या व पिवळ्या रेशनकार्डधारकांसाठी ई-केवायसी करण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू केली होती. त्यात सर्व रेशनकार्डधारकांनी ई-केवायसी करणे अनिवार्य होते. -त्यासाठी आता शेवटची तारीख ३१ ५ डिसेंबर २०२४ आहे. आतापर्यंत दोनवेळा ई-केवायसी प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे.

महापुरुषांच्या अभिवादनाने उमेदवारांची होतेय सुरुवात

प्रचाराचा धुरळा : पदयात्रा अन् कॉर्नर सभांवर भर

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

विधानसभा निवडणुकीतसोमवारी नामांकन मागे घेण्यात आले. त्यानंतर उमेदवारांना चिन्ह घोषित झाले. मंगळवार, (दि. ५) पासून जिल्ह्यातील आठही मतदारसंघांत प्रचाराचा धुरळा उडाला आहे.

नोंदणीकृत, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे चिन्हदेखील मतदारांपर्यंत अगोदरच पोहोचले आहे. काही उमेदवारांनी देवदर्शन घेतले तर काहींनी कुलदैवतांच्या चरणी आशीर्वाद घेत प्रचाराला प्रारंभ केला. गावखेड्यात सकाळपासून प्रचार वाहनांची धूम दिसून आली. दरम्यान, थोर पुरुष, घरातील वडीलधाऱ्या मंडळीचा आशीर्वाद घेऊन उमेदवार सकाळी प्रचारासाठी घराबाहेर पडत आहे.

जिल्ह्यात आठ जागांसाठी एकूण १६० उमेदवार रिंगणार आहेत. उमेदवारांना त्यांचे निवडणूक चिन्ह, वैयक्तिक माहिती विविध पक्षांचे झेंडे, बॅनर, पोस्टर पहिल्याच दिवशी गावात पोहोचल्याचे कुतूहलही मतदारांमध्ये दिसून आले. साहित्य, जाहीरनामा, निवडणूक चिन्ह, उमेदवारांचे आवाहन थेट मतदारांच्या दारापर्यंत पोहोचविण्याची किमया करणार आहे. रॅली, पदयात्रा, सभा, कॉर्नर बैठकांसाठी कार्यकर्ते, समर्थकांची गर्दी जमा करण्याचे कसब उमेदवारांसह राजकीय पक्षांना करावे लागणार आहे.

प्रचार वाहन गावखेड्यात पोहोचले

मंगळवारपासून थेट प्रचाराला प्रारंभ झाला. मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी कमी कालावधी आहेत. कमी दिवसात जास्त श्रम घ्यावे लागणार असल्याने मतदारांना आकर्षित करण्यासाठी रणनीती आखली जात आहे. काही उमेदवारांनी प्रचारासाठी 'इव्हेंट मॅनेजमेंट' नेमले आहे. ही खासगी यंत्रणाद्वारे उमेदवारांनी प्रचार सुरू केला आहे. सकाळीच शहरापासून तर गावखेड्यात प्रचार वाहन पोहोचल्याचे दिसून आले. आशीर्वाद, भेटीगाठींचा पहिला दिवस राजकीय पक्ष असो वा अपक्ष उमेदवार, या सर्वच उमेदवारांनी मंगळवारी प्रचाराला सुरुवात केली आहे. कुणी देवदर्शन घेतले. कुणी महापुरुषांच्या विचारांना नमन केले. तर काहींनी आईवडिलांच्या चरणी नतमस्तक होऊन प्रचाराला प्रारंभ केला.

महाराष्ट्र लुटायचा होता म्हणून गद्दारी केली

उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर डागली तोफ : यशोमती ठाकूर यांचा वाघीण असा उल्लेख : वलगाव येथील विराट सभेतील गर्दीमुळे विरोधकांचे धाबे दणाणले

विदर्भ प्रजासत्ताक
दि. ७ अमरावती

नुसत्या निवडणूक आल्या की योजनांचा महापुर आणायचा, मात्र रोजगाराचा पत्ता नाही. विरोधकांना महाराष्ट्र लुटायचा होता म्हणून त्यांनी आमच्याशी गद्दारी केली आणि सरकार पाडले. माझी बहीण यशोमती ठाकूर ह्या वाघीण आहेत,त्या संकट काळात पाठीशी उभ्या होत्या. सत्तेतील तिघे म्हणजे भाऊ-भाऊ, सगळे मिळून महाराष्ट्र खाऊ,अशी यांची ही भाऊबंदकी आहे. आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून बहिणींवर प्रेम दाखविणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी महिलावर झालेल्या अत्याचाराबद्दल ही बोलावे. ही निवडणूक महाराष्ट्र प्रेमी आणि महाराष्ट्र द्रोही यांच्यात होत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. आता मात्र दाढीवाला,देवा भाऊ आणि जॅकेटवाल्यांनी राज्य कर्जबाजारी केले असा गंभीर आरोप शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला.वलगाव येथील यशोमती ठाकूर यांच्या प्रचार्थ आयोजित येथील जाहीर सभेत उद्धव ठाकरे बोलत होते. महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ वलगाव येथे विराट सभा घेण्यात आली. यावेळी व्यासपीठावर छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र बघेल, खा. अरविंद सावंत, आ. मिलिंद नार्वेकर,काँग्रेस पक्षाचे नेते कुणाल चौधरी, उदय पानसे,महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर, खा.बळवंत वानखडे, रिपाई नेते डॉ. राजेंद्र गवई, माजी खा.अनंत गुढे, विलास इंगोले,श्याम भाऊ देशमुख,सुधीर सूर्यवंशी, आसावरी देशमुख, कांचनमाला गावंडे,गजानन लवटे दिलीप. एडतकर, संगीता ठाकरे,यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितले की यशोमती ठाकूर ह्या माझ्या मंत्रिमंडळात कर्तबगार मंत्री होत्या,त्यांनी महाराष्ट्र राज्यात चांगले काम केले असून तिवसा मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे. शेतकरी महिला आणि दुर्बल घटकासाठी यशोमतीने केलेले कार्य प्रशंसनीय आहे. यशोमती सारख्या बुलंद व कर्तबगार नेत्याची राज्याला गरज आहे त्यांना मोठ्या मताधिक्याने आपण विजयी करावं असे आवाहन करून उद्धव ठाकरे यांनी अमरावती जिल्ह्यातील सर्वच मतदार संघात महाविकास आघाडीला नागरिकांची साथ असल्याचे नमूद केले. लोकसभेसारखाच विश्वास विधानसभेतही दाखवावा जेणेकरून येणाऱ्या काळात भ्रष्टाचारी व गद्दारांना त्यांची जागा दाखवून देऊ आणि महाराष्ट्र पुन्हा सुजलाम सुफलाम करू असे प्रतिपादन केले. आपला अजूनही न्यायदेवतेवर विश्वास आहे संविधान मारायला निघालेल्या सत्ताधाऱ्यांचा पराभव करा आपली सत्ता नक्की येणारच अजूनही लढाई संपली नाही सर्वांनी दक्ष राहू महाविकास आघाडीला आशीर्वाद द्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी यशोमती ठाकूर यांच्या वर आधारित गीताचे देखील विमोचन करण्यात आले. प्रारंभी उद्धव ठाकरे यांचे जंगी स्वागत करण्यात आले.सभेला विलासराव माहुरे,आशिष धर्माळे,मनोहर बुध, डॉ. नरेंद्र निर्मळ ,भैय्यासाहेब निर्मळ, नाना नागमोते, प्रतिभा बोपशट्टी,तेजस्विनी वानखडे,पराग गुडधे, सागर देशमुख,ज्योती अवघड, आश्विनी इंगळे, प्रवीण आळसपुरे,नितीन हटवार, विजय चप्परिया, हरिभाऊ मोहोड,मनोज देशमुख, किशोर चांगोले,डॉ,चंद्रशेखर कुरळकर,संजय नागोने, मनोज अंबाळकर, प्रकाश काळबांडे, गजानन राठोड,प्रवीण मनोहर, हरीश मोरे, अमित गावंडे, अबरार काशीद, शिल्पा महल्ले मुकद्दर खां पठाण, जयंतराव देशमुख, श्रीकांत बोंडे, सतीश पारधी,वैभव वानखडे, रमेश काळे,नरेंद्र मकेश्वर यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकतंत्र व संविधान वाचवा

बघेलज्या भूमीला महापुरुषांचा वारसा लाभला आहे त्या भूमीत आज अतिशय गलिच्छ राजकारण केले जात आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये महाराष्ट्रातील नागरिकांना न्याय दिला जात असतानाच आज सर्वच घटकावर अन्याय होताना दिसत आहे. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील नागरिकांनी भाजपाला भुईसपाट करून मोदीविरोधात कौल दिला.आज देशात भयावह परिस्थिती असून संविधान आणि लोकतंत्र धोक्यात आले आहे ते वाचविण्यासाठी आपण महाविकास आघाडीला मोठ्या मताधिक्याने विजयी करावं.असे आवाहन केले.

ये जनता है सब जानती है

शेतकऱ्यांच्या आत्महत्या,महिला वरील अत्याचार, तोडफोडीच राजकारण, वाढती गुन्हेगारी याला कंटाळून महाराष्ट्रातील जनता पुन्हा महाविकास आघाडीला बहुमताने निवडून देतील. सत्तेतील कमिशनखोर आणि चोरांना घरी बसवा. कायदा आणि सुव्यवस्थेचा कोणताही आधार न घेता संविधानाची तोडफोड करणाऱ्या आणि जातीत तेढ निर्माण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करा असे आवाहन करून यशोमती ठाकूर यांनी ये जनता है सब जानती है असे सांगून विरोधकांवर चांगलीच तोफ डागली.

वेगवेगळे मतदान कार्ड असेल तर होऊ शकतो कारावास

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

निवडणुकीत मतदानासाठी निवडणूक आयोगाने १२ प्रकारची ओळखपत्र ग्राह्य धरली आहेत. यात मतदान कार्डाचाही समावेश आहे. मतदान दिनी मतदार ओळखपत्र अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज मानले जाते. अन्य ओळखपत्र नव्हते तेव्हा मतदार ओळखपत्र हाच एकमेव ओळखीचा पुरावा होता. मात्र, आता अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत, असे असले तरी दोन वेगवेगळी मतदार कार्ड असणे कायद्याने गुन्हा आहे. अशावेळी कारावासही भोगावा लागू शकतो.

मतदार ओळखपत्र हा एक आवश्यक शासकीय दस्तऐवज आहे. नागरिकांना मतदान करता यावे, यासाठी ओळखपत्र अनिवार्य आहे. पण, दोन किंवा त्यापेक्षा अधिक मतदार ओळखपत्र बाळगल्यास कारावास भोगावा लागू शकतो. मतदारयादीत एकापेक्षा जास्त वेळी मतदार म्हणून नोंदणी करणे, हासुद्धा गुन्हा आहे. त्यामुळे मतदारांनी निवडणूक ओळखपत्र तयार करतानाखबरदारी व काळजी घेणे महत्त्वाचे मी आहे. सध्या विधानसभा निवडणुकीची ना आचारसंहिता सुरु आहे. मतदानकार्डाविषयी काही फ्रॉड आढळल्यास निवडणूक भायोगाकडून कठोरात कठोर शिक्षेचे प्रावधान आहे.

...तर यादीतील नाव कसे वगळावे?

एका व्यक्तीकडे दोनपेक्षा अधिक ओळखपत्र किंवा दोन मतदार याद्यांमध्ये नाव असल्यास हे रद्द करण्यासाठी फॉर्म क्र. ७ भरावे लागते. ही प्रक्रिया ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने करता येते. सर्व माहिती योग्य भरल्यास काही काळ प्रतीक्षा करावी लागते. या प्रक्रियेसाठी अधिकची माहिती निवडणूक कर्मचाऱ्यांकडून घेता येते. याशिवाय बीएलओ पूर्ण सहकार्य करू शकतात. यासाठी निवडणु- कीपूर्वी संक्षिप्त मतदारयादी पुनरिक्षण कार्यक्रम राबविला जातो. यावेळी ही दुरुस्ती केली जाऊ शकते.

नको असलेले मतदार कार्ड रद्द करण्यासाठी तालुका मुख्यालयाच्या निवडणूक विभागात जाऊन ऑफलाइन अर्ज सादर करता येतो. अर्ज केल्यानंतर नको असलेले मतदार कार्ड रद्द करता येते.

वरवधुसह वऱ्हाडी यांना मतदानाची शपथ : मेश्राम व भालेकर कुंटूबाचा आदर्श : मनपा व जिल्हा स्वीप कक्षाचा उपक्रम

SVEEP
मतदार जनजागृती मोहीम
विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४
०३८-अमरावती विधानसभा मतदारसंघ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

विधानसभा निवडणूक येत्या २०तारखेला होत आहे,या निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढावा म्हणून स्मीप कक्षा व्दारे विविध उपक्रम राबविल्या जात आहे.याचाच एक भाग म्हणुन आज सखा मगलम येथे विवाह सोहळ्यात वरवधु व वर्हाडी मंडळी यांना मतदानाची शपथ देण्यात आली. अमरावती येथिल कु,सुजाता बळीराम भालेकर व नागपूर येथिल चि.लक्ष्मीकांत मेश्राम यांचा मंगल परिणय सोहळा जुनाबायपास वरील सखा मंगलम येथे आयोजित करण्यात आला होता.या लग्न सोहळ्याचे अवचित्य साधुन येथे स्वीप कक्षाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी मतदाना बाबत माहीती देऊन उपस्थितांना मतदानाची शपथ दिली. ? येत्या विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता प्रशासनाच्या वतीने जिल्हा परिषद विभाग व महानगरपालिका विभाग मिळून सतत विविध उपक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहेत.

परंतु जोपर्यंत स्वतः नागरिक, मतदार यामध्ये स्वतःहून सहभागी होणार नाही तोपर्यंत उपक्रमाची यशस्वीता पूर्ण होऊ शकणार नाही हे लक्षात घेऊन भालेकर परिवार व मेश्राम परिवार यांनी समाजापुढे एक वेगळा आदर्श ठेवत आपल्या मुला आणि मुलीच्या लग्नात सर्व उपस्थित पाहुण्यांना मतदान करण्याबाबत शपथ देऊन जनजागृती करण्याचे उल्लेखनीय व आगळे वेगळे कार्य केले आहे.

विशेष म्हणजे या मतदानाच्या शपथ वेळी स्वतः वधू आणि वर दोघांनीही मतदानाबाबत शपथ घेतली व इतरांनाही मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता आव्हान केले.

स्थानिक सखा मंगलम येथे श्री बळीरामजी भालेकर यांची मुलगी सुजाता व श्री.मधुकरराव मेश्राम यांचे पुत्र लक्ष्मीकांत यांचा नुकताच विवाह पार पडला.

यावेळी स्वीप विभागातील राजेश सावरकर, योगेश पखाले, हेमंत कुमार यावले , प्रवीण ठाकरे ,उज्वल जाधव, योगेश राणे, सोमेश वानखडे ,प्रवीण माहुलकर ,गणेश सावंत ,संतोष साहू,आदित्य तायडे यांच्यामार्फत उपस्थित शेकडो पाहुण्यांना मतदानाबाबत आवाहन करण्यात आले. मतदान जनजागृती करून पार पडलेल्या या उल्लेखनीय विवाह सोहळ्याचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

नेतेमंडळींची प्रचारानिमित्त वाढदिवस, लग्न, अंत्यविधिसाठी धावपळ

विदर्भ प्रजासत्ताक
दि. ७ अमरावती

विधानसभा निवडणुकीसाठी नेतेमंडळींनी रान उठवायला सुरुवात केली असून, प्रचाराची प्रत्येक संधी टीपण्याचा प्रयत्न सुरू आहे. यातून कार्यक्रम, वाढदिवस आणि स्मशानातले अंत्यविधीही सुटलेले नाहीत. प्रत्येक ठिकाणी स्वतः चे अस्तित्व दाखविण्याचा खटाटोप सुरू आहे.

निवडणुका तोंडावर आल्या की. नेत्यांना मतदारांचा उमाळा येणे स्वाभाविक आहे, हेच कारण आहे की, काहीही करून आता मतदार आपल्याकडे वळविण्यासाठी नेते प्रत्येक कार्यक्रमाला अगत्याने हजेरी लावत आहेत. त्यात वाढदिवस, गृहप्रवेश एवढेच नव्हे तर अंत्यविधीलाही जात आहे. यामागे फक्त एकच प्रामाणिक हेतू तो म्हणजे या कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये बसायचे व त्यांची गाठभेट घेऊन संपर्क वाढविणे हा आहे.

कार्यक्रम ठरत आहेत प्रचाराचे माध्यम

उमेदवारांकडून मतदारांपर्यंत पोहोचून संपर्क वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. सध्या दिवाळी मिलन, तसेच अन्य कार्यक्रम सुरूच आहेत. त्यातच निवडणुकीचाही हंगाम असल्याने नेत्यांना कार्यक्रमांतील गर्दी आयतीच हाती लागत आहे. नेतेमंडळी हे कार्यक्रम गाठून आपली हजेरी लावत आहेत.

अत्यंविधीलाही हजेरी

कुणाच्या सुखात गेले नाही तर चालते, पण दुःखाच्या प्रसंगात मात्र नक्की गेले पाहिजे, असे म्हटले जाते. कारण, कठीण प्रसंगी आलेल्या व्यक्तीला कधीच विसरता येत नाही. नेमक्या या युक्तीप्रमाणेच नेतेमंडळी सध्या वागताना दिसत आहेत, यामुळेच त्यांचे विशेष लक्ष मरणाकडेही आहे. कुणाचे निधन झाले तर नेते व कार्यकर्ते लगेच उपस्थित होत आहेत.


आदरांजली
समाजशास्त्रज्ञ
स्व.प्रा.डॉ. मुरलीधरराव रामराव देशमुख (काजळीकर)
यांच्या जयंती निमित्त
विनम्र आदरांजली..
श्रीमती मंदाताई मु. देशमुख (काजळीकर)
प्रा.हेमंत देशमुख, प्रा.सौ. रागिनी देशमुख, प्रा. शिरीष देशमुख, प्रा. सौ. सिमा देशमुख,
प्रा. प्रवीण देशमुख, सौ. रचना देशमुख, प्रा. प्रतिक सु. देशमुख, प्रा. सौ. कल्याणी देशमुख,
श्री.मोहीत बेनाडीकर (कोल्हापुर), सौ.गार्गी बेनाडीकर, श्री.यस्मित बंड, डॉ. सौ. वैष्णवी बंड,
श्री.यश धुमाळ (मुंबई), सौ. सिध्दीका धुमाळ, इंजि. कार्तीक देशमुख कु. विहा व काजळीकर परिवार